|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १२ | अंक : ७ | सोमवार दि. ०५ फेब्रुवारी २०२४ ते रविवार दि. ११ फेब्रुवारी २०२४ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## सख्खा भाऊ पक्कावैरी झाला दारुड्या भावाचा खून केला

औसा/शिवाजी मोरे

आजकाल समाजात नितीमत्ताच राहिलेली नाही. त्यामुळे रक्ताची नाती सुद्धा कधी रक्तरंजित होतील याचा नेम नाही. लातूर जिल्ह्याच्या तुंगी गावात दारू पिऊन सतत त्रास देतो म्हणून भावानेच भावाचा खून केला. या प्रकरणी आईनेही मुलाला ठार मारण्यासाठी आपल्या दुसऱ्या मुलाला मदत केली म्हणून आई व मुलाला अटक करण्यात आली आहे.

दारू पिऊन सतत भांडण करणाऱ्या कारणावरुन ...पान २ वर

# सत्ता आमच्या बापाची आमचे कोण काय करणार भाजपाचे शिलेदार आम्ही कोणालाही ठोकणार



आमदार गणपत गायकवाड

कल्याण/क्राईम रिपोर्टर

आजकाल सत्तेच्या राजकारणात नितीमत्ता राहिलेली नाही. त्यामुळे 'जिसकी लाठी उसकी भैस' या नियमाने राजकारण सुरु आहे. आणि अशा राजकारणाचा केंद्रबिंदू हा पैसा असल्याने व पैसा भ्रष्ट मार्गाने मिळवला जात असल्याने राजकीय पुढाऱ्यांना सत्तेचा आणि पैशांचा माज आलाय. त्यामुळे याच हरामाच्या पैशांवर जगणाऱ्या पुढाऱ्यांची मुजोरी सुरु आहे. शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र हे प्रज्ञावंतांचे राज्य म्हणून ओळखले जाते. पण काही गुंड प्रवृत्तीच्या पुढाऱ्यांमुळे महाराष्ट्राची ही ओळख आता बदलत चालाली आहे. आताचा महाराष्ट्र हा गुंड, भ्रष्ट मुजोर आणि सत्तेसाठी गद्दारी करणाऱ्या पुढाऱ्यांचा महाराष्ट्र म्हणून ओळखला जातोय. जे सत्तेत आहेत त्यांना इतकी मस्ती आली आहे कि ते पोलिसांना किंवा कायद्याला जुमानायला तयार नाहीत. मागे एका सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने सरकारी कर्मचाऱ्याला मारहाण केली होती. तर अब्दुल सत्तार सारख्या मंत्र्याने खासदार सुप्रिया सुळे यांना भिक्कार चोट म्हटले होते. जे सत्तेत आहेत त्यांना ताळतंत्रच राहिलेले नाही. कोणालाही शिवीगाळ करणे, धमक्या देणे सुरूच असते. त्यामुळे या पुढाऱ्यांना जनतेचे लोकप्रतिनिधी म्हणायचे कि नाक्यावरचे टपोरी गुंड म्हणायचे तेच कळत नाही. सत्तेच्या जोरावर त्यांची सुरु असलेली मुजोरी फार काळ टिकणारी नाही. कारण सत्ता हि मृगजळासारखी असते. आज आहे तर उद्या नाही. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कुणीही आलेला नाही. हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अनेक वेळा सांगितले आहे. तरीही सत्तेतल्या पुढाऱ्यांची खुमखुमी काही कमी झालेली नाही आणि आता तर पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात जमिनीच्या वादातून अनेक पुढारी एकमेकांच्या जीवावर उठले आहेत. अशाच एका जमिनीच्या वादातून कल्याणचे भाजपा आमदार गणपत गायकवाड यांनी उल्हासनगर पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार केला. यात शिंदे गटाचे शहर प्रमुख महेश गायकवाड, राहुल पाटील जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी गणपत गायकवाड यांच्यासह तिघांना पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्या ११ दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. आता सत्ताधारी पक्षाच्या आमदारानेच एवढा गंभीर गुन्हा केला आहे. त्यामुळे गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस कठोर कारवाई करणार कि आपल्या आमदाराला सांभाळून घेणार? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. मात्र या घटनेने महाराष्ट्रात सत्तेत असलेल्या लोकांची मुजोरी कुठवर पोचली आहे तेच दिसून येते. या घटनेने पुन्हा एकदा भाजपची सर्वत्र छी थू सुरु झाली आहे. उल्हासनगर येथील हिल लाईन पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या द्वारली गावाजवळ महार वतनाची जमीन आहे. ती जमीन एकनाथ जाधव हे कसत होते, तर या जमीनीवर शिवसेनेचे (शिंदे) कल्याण शहर प्रमुख महेश गायकवाड व कल्याण पुर्वेचे आमदार ...पान २ वर

## पतीला सोडून प्रियकराशी थाटला संसार चिडलेल्या पतीने दोघांनाही केले ठार

अथणी/क्राईम रिपोर्टर



पत्नीचे प्रेमप्रकरण जर लग्नानंतर उघडकीस आले, तर पतीला ते अजिबात सहन होत नाही. यल्लमा वाडीतील तौफिकचे सुद्धा तसेच झाले. हीना कौसर हिच्याशी त्याचे लग्न तर झाले, पण तिचा पहिला प्रियकर यासिन याला ती सोडायला तयार नव्हती. अखेर त्यांचा घटस्फोट झाला व हिने यासीन बरोबर दुसरे लग्न केले. या गोष्टीचा तौफिक याला इतका राग आला कि त्याने यासीनच्या घरात घुसून यासीन व हिनाची हत्या केली. इतकेच नाही तर मधे सोडवायला आलेल्या हिनाच्या आईला आणि मेव्हण्यालाही जखमी केले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी तौफिक याला अटक केली आहे.

अथणी तालुक्यातील यल्लाम्मावाडी येथे तौफिक उर्फ बालेसाब कॅडी हे आपल्या कुटूंबासह राहयला आहेत. तौफिक हा मिळेल ते काम करून आपल्या कुंटूंबाला हातभार लावीत होता.त्याचे वय लग्नायोग्य झाल्याने त्याच्या आई वडिलांनी त्याच्यासाठी समाजातील मुलीचा शोध घ्यायला सुरूवात केली. पै-पाहुण्याकडून त्यांना गावातीलच अमिना बागोडे याच्या मुलीचे स्थळ चालून आले. त्याची मुलगी अमिना बागोडे १९ वर्षीय हिना ही दिसायला देखणी आणि सुंदर अशी होती. तिचे आरसपाणी सौंदर्य हे चार चौघांत उठून दिसत होते. हिनाला पाहताच तौफिक याने लगेच लग्नाला होकार दिला. त्यावेळी त्याने मागचा पुढचा कोणताच विचार केला नाही.किंवा हिनाची त्याने कोणतीही चौकशी केली नाही. अमिना बागोडे याचे कुंटूंब हे मुळचे विजयापुरचे.त्याच्या पतीचे गेल्या काही वर्षापूर्वी निधन झाले. अमिना यांना दोन मुलीच होत्या. मोठया मुलीचे लग्न त्यांनी अथणी तालुक्यातील यल्लम्मावाडी येथील मुस्ताक मुल्ला याच्याशी झाले असल्याने नवऱ्याच्या मृत्यूनंतर अमिना यांनी मुलगी हिनाला घेऊन यल्लम्मावाडी येथे राहु लागल्या. त्यातच त्यांच्या दुसऱ्या मुलीला ही यल्लाम्मावाडी येथील तौफिक याचे स्थळ आल्याने त्यांनी जावायाच्या मदतीने हिनासाठी हे स्थळ पक्के केले. तीन वर्षापूर्वी समाजाच्या रितीरिवाजानुसार त्यांनी हिनाचा निकाह तौफिक याच्याबरोबर लावून दिला. तौफिकच्या घरची परिस्थीती हे तशी बेताचीच. मोलमजुरी करून तो आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. हिनाचे लग्नाअगोदर गावातीलच यासीन बागोडे याच्याबरोबर प्रेमसंबंध होते. लग्नानंतर ही तिचे यासीनबरोबर प्रेमसंबंध चालू होत, ही गोष्ट तिचा नवरा तौफिक याला माहित नव्हती. यासीन हा हिनाच्या नात्यातील होता. दरम्यानच्या काळात तौफिक याचे हिनाबरोबर कोणत्या ना कोणत्या कारणातून भांडणे होऊ लागली. ...पान २ वर

## वाहयात गेलेल्या मुलापुढे बाप थकला शीतपेयातून विष देऊन मारून टाकला

सोलापुर/क्राईम रिपोर्टर





प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते कि आपल्या मुलाने चांगले वागावे, शिक्षण घेऊन मोठे व्हावे व आपल्या म्हातारपणाचा आधार बनावे. पण काही मुले लहानपणापासूनच वाईट संगतीमुळे बिघडतात. अशा मुलांना काही आई-वडील मायेपोटी दम देत नाहीत तर काही पालक मात्र मुलांना धाकात ठेवतात. पण सोलापुरातील भवानी पेठेत राहणाऱ्या विजय बट्टयांचा ८वी मध्ये शिकणारा विशाल दिवसेंदिवस बिघडत चालला होता. शाळेला दांड्या मारणे, मुलींची छेड काढणे, असले प्रकार वाढत चालले होते. अखेर कंटाळलेल्या बापाने स्वतःच त्याला शीतपेयातून विष देऊन त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.

सोलापूर शहरातील औदयोगीक वसहातीतील भवानी पेठ येथे विजय बट्ट हे आपली पत्नी किर्ती बट्ट आणि १४ वर्षीय मुलगा विशाल बट्ट असे राहयला आहेत. विजय बट्ट याची घरची परिस्थीती तशी बेताचीच असल्याने ते आणि त्याची पत्नी हे ...पान २ वर

## क्रिकेट सामन्यानंतर मोठा राडा झाला विजयी संघातील पोलिसाचा जीव गेला



जळगाव (चाळीसगाव)/क्राईम रिपोर्टर

खेळत हारजीत ठरलेली असते. पण काहीना पराभव पचवता येत नाही आणि त्यातून वाद होतात. सध्या क्रिकेट हा खेळ शहरी आणि ग्रामीण भागातही लोकप्रिय आहे. मात्र अनेक ठिकाणी या खेळत वाद होऊन हाणामारी झालेल्या आहेत. चाळीसगाव येथे अशाच एका घटनेत क्रिकेट सामन्यातील पराभूत संघातील खेळाडूंनी विजयी झालेल्या खेळाडूंवर हल्ला केला. यात विजयी टीम मधील पोलीस दलातील क्रिकेट खेळाडूला प्राण गमवावा लागला. या प्रकरणी हल्लेखोरांना पोलिसांनी अटक केली आहे.



क्रिकेट हा तरुणांचा आवडता खेळ समजला जातो. गल्लीत अथवा गावोगावी मैदानावर क्रिकेट खेळतांना क्रिकेटच्या जय पराजयातून दोन गटात कधी कधी कमी अधिक प्रमाणात वाद होत असतात. मात्र क्रिकेटच्या खेळात होणाऱ्या जय पराजयातून काही ठिकाणी खूनाच्या देखील घटना घडतात. खेळ म्हटला म्हणजे कोणत्या तरी टीमचा जय आणि कोणत्या तरी टीमचा पराजय हा ठरलेला असतो. मात्र जय पराजयाच्या या लढाईत पराजय झाल्याचे शल्य पराजीत टीममधील तरुणांना कधी कधी स्वस्थ बसू देत नाही. विजयी टीमचा जल्लोष पराजीत टीममधील तरुणांना आपल्याला खून्नस दिल्यासारखा वाटतो. त्यातून कधी कधी खूनासारखी अप्रिय घटना घडते. मात्र प्राणघातक हल्लयातून जेव्हा खूनासारखी घटना घडते त्यावेळी एखाद्याचा जीव जातो. या घटनेतून जीव गमावलेल्या तरुणाच्या परिवाराचा आधारवड कोसळत असतो. मरण पावणारा तरुण कुणाचा तरी मुलगा अथवा पती असतो. त्याच्या जाण्याने त्याच्या परिवारावर दुखा:चा डोंगर कोसळतो याची कल्पना हल्ला करणाऱ्या तरुणांना घटनेच्या वेळी येत नाही. ...पान २ वर

## फाटक्या संसारातील वाद विकोपाला गेला वायरने गळा आवळून पत्नीचाच खून केला



मयत रेखा

सोलापूर (यत्नाळ)/इरप्पा बोरीकरजगी

गरिबी खूप वाईट असते. गरिबी माणसाला वाईट मार्गाकडे नेवून गुन्हेगार बनवते. तर गरिबीमुळे घरातल्या गरजा पूर्ण होत नसल्याने पती पत्नीत सतत भांडणे होतात आणि त्यातुन् संसार उध्वस्त होतो. यत्नाळ गावातील शरण बसप्पा हा मजूर होता त्याला पत्नी व दोन मुले होती. त्याच्या मजुरीत घर चालत नसल्याने त्याच्या पत्नीला माहेरचे लोक मदत करायचे. शरणबसप्पा सतत पत्नीला माहेरवरुन पैसे आणायला सांगायचा. त्यावरून दोघांमध्ये भांडणे व्हायची. याच भांडणात एकेदिवशी शरणबसप्पाने पत्नी रेखाची वायरने गळा आवळून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

कौटुंबिक स्थिती अत्यंत हलाखीची गरिबी सहन होत नव्हती सातत्याने तिला छळायचा तरीही सारे काही सहन ...पान ६ वर

## तीन वर्षांच्या तुरुंगवासामुळे सुडाने पेटला अखेर सपनाची हत्या करून बदला घेतला

मुंबई/एस.कुमार



एका महिलेच्या तक्रारीवरून ३ वर्षाची शिक्षा झालेल्या इसमाने तुरुंगातून येताच त्या महिलेची अत्यंत निर्घुणपणे हत्या केली व पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



पो.उपा संजय लाटकर

२२ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास शिवडी पोलीस ठाणे हद्दीत बी पी सी एल कंपनीचे पाठीमागे, टिकटॉक पाईन्ट, या ठिकाणी गर्द झाडीमध्ये एका अनोळखी महिलेचा कुजलेल्या अवस्थेत चेहरा विच्छीन्न केलेल्या स्थितीत मृतदेह पडला असल्याची माहिती शिवडी पोलिसांना मिळाली. पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन तातडीने घटनास्थळी धाव घेतली.मृतदेहाची पाहणी करून या घटनेबाबत अपमृत्यू कमांक ९/२०२४, कलम १७४ फौ.प.सं प्रमाणे नोंद घेण्यात येवून तपास सुरू करण्यात आला. त्यानंतर तो मृतदेह शवविच्छेदनासाठी के ई एम रुग्णालयात पाठवण्यात आला. सदर अनोळखी महिलेच्या मृतदेहाचे शवविच्छेदनानंतर तिच्या मृत्युचे कारण डोक्याला मार लागला असल्याचे निदान के.ई.एम. रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी यांनी केले. यावरून सदर अनोळखी महिलेचा मृत्यु हा अज्ञात इसमाने तिला जिवे ठार मारून पुरावा नष्ट करणे करीता तिचा चेहरा जाणिवपूर्वक नष्ट केलेला आहे. ...पान ६ वर

## दारुच्या नशेत चौघेही खूपच झिंगले एकाच्या खुनाने तिघांचेही हात रंगले

जळगाव (मोहीदेपुर)/क्राईम रिपोर्टर



दारूच्या नशेत माणसाला शुद्ध रहात नाही. अशावेळी शुल्लक कारणावरून भांडणे होतात. तसेच दारूची नाश डोक्यात भिनलेली असल्याने कोणाच्या हातून काय घडेल हे सांगता येत नाही. मोहिदेपूर येथील अशाच एका घटनेत जेवणासाठी आसल गाव येथे गेलेल्या ४ नातेवाईकांनी अगोदर दारूची पार्टी केली. मात्र दारूची नशा डोक्यात भिनलेली असतानाच एकाचा धक्का लागून मोबाईल खाली पडला. एवढे निमित झाले, त्यावरून झालेल्या वादात तिघांनी मिळून आपल्या चौथ्या नातेवाईकाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

जळगाव (जा) तालुक्यातील 'मोहीदेपुर गावातून उदरनिर्वाहासाठी नागपूर येथे गेलेल्या गावातील तिघांना २०१२ मध्ये कळमना परिसरात जमावाने चोर समजून ठेचून मारल्याची दुर्दैवी घटना घडली होती, त्यामुळे मोहीदेपुरची ओळखराज्यात झाली. याच गावात सौरव विजय शिंदे हा २२ वर्षीय युवक रहायचा. त्याच्या कुटुंबात आई, ३ भाऊ आणि बहीण असे सदस्य होते. यामध्ये सौरव सर्वात लहान असून त्याचा विवाह गेल्या वर्षी झाला. मोलमजुरी करून सौरव कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी हातभार लावत होता. ...पान ६ वर

## प्रियकरावर तिने जीव ओवाळून टाकला पतीची हत्या करून मृतदेह विहिरीत फेकला

डोंबिवली/क्राईम रिपोर्टर

पहिले प्रेम सहसा माणसाला विसरता येत नाही. अशावेळी एखाद्या मुलीचे तिच्या इच्छेविरुद्ध दुसऱ्याशी लग्न झाले तर तिचे संसारात मन रमत नाही. कारण तिला प्रियकराला विसरणे अशक्य असते. डोंबिवलीत अशाच एका घटनेत एका महिलेने प्रियकराच्या मदतीने पतीची निर्घुण हत्या केली व या हत्येला वाचा फुटू नये म्हणून मृतदेहाच्या गळ्यात वजनदार दगड बांधून मृतदेह विहिरीत फेकला. पण खुनाचे हे प्रकरण उघडकीस आले असून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.




प्रेमात अडथळा ठरणाऱ्या पतीची पत्नीने आपल्या मित्र आणि त्याच्या साथीदारांच्या मदतीने अतिशय क्रूरपणे गेल्या आठवड्यात हत्या केली. त्याचा मृतदेह आडिवली गावातील एका विहिरत अवजड दगड बांधून फेकून दिला. मृतदेहाची ओळख पटताच ही हत्या मयताच्या पत्नीने आपल्या मित्राच्या मदतीने केल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली.वहिरीत आढळलेला मृतदेह चंद्रप्रकाश लोवंशी यांचा होता. चंद्रप्रकाश यांच्या पत्नीने गेल्या आठवड्यात पती चंद्रप्रकाश बेपत्ता असल्याची तक्रार मानपाडा पोलीस ठाण्यात केली होती. चंद्रप्रकाशचा मारेकरी सुमित राजेश विश्वकर्मा, रिता चंद्रप्रकाश लोवंशी यांना पोलिसांनी अटक केली आहे. रिता आणि सुमित ...पान ६ वर

05 TO 11 FEBRUARY 2024 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 2/3/2024 9:46 PM Page 1



पान १ वरून...

## सत्ता आमच्या बापाची आमचे...

गणपत गायकवाड यांनी दावा केला होता. हा वाद न्यायालयात असताना दोन्ही गटात वाद निर्माण झाला होता. दरम्यान या दोन्ही गटात समेट घडवुन आणण्यासाठी हिल लाईन पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक अनिल जगताप यांच्या दालनात बैठक बोलवली होती. तेव्हा बैठकीत आमदार गणपत गायकवाड यांचा मुलगा वैभव गायकवाड व महेश गायकवाड यांच्या शिविगाळ झाली. हा राग गणपत गायकवाड यांना आला असता त्यांनी जवळ असलेले रिव्हॉल्व्हर काढुन महेश गायकवाड यांच्या दिशेने त्यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केला, तर हर्षल केणे याने सुध्दा गोळीबार केला असुन गायकवाड यांनी सहा राऊंड फायर केले असल्याने त्या गोळ्या महेश गायकवाड यांच्या पोटावर लागल्या. सहा गोळ्या लागल्याने महेश गायकवाड गंभीर जखमी झाले, तर राहुल पाटील यांना सुध्दा गोळी लागल्याने ते ही जखमी झाले आहेत. या जखमींना सुरवातील उल्हासनगर येथील मीरा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करुन त्यांच्या शरीरातील गोळ्या काढण्यात आल्यांतर त्यांना ठाणे येथील ज्युपिटर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून सध्या ते व्हेंटिलेटरवर असल्याने त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे बोलले जाते. या गोळीबार प्रकरणी चैनु नाथा जाधव यांच्या तक्रारीवरुन आमदार गणपत गायकवाड, हर्षल केणे, संदीप सरवणकर, वैभव गणपत गायकवाड, नागेश बढेकर, विजय गणोत्रा व इतर सात जणावर कलम ३०७, १२० (ब) १४३, १४७, १४८,१४९, १०९, ३२३, ५०४ सह शस्त्र अधिकलम ३० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. या गुंह्यात आमदार गणपत गायकवाड, हर्षल केणे व संदीप सरवणकर यांना अटक केली असुन यातील तीन जण फरार असल्याचे पोलिसानी सांगितले आहे. गायकवाड यांची रिव्हॉल्वर पोलिसानी जप्त केली. दरम्यान या गुंह्याचा तपास ठाणे क्राईम ब्राँचकडे सोपविण्यात आला असुन या आरोपीना उल्हासनगर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ११ दिवसांची पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## पतीला सोडून प्रियकराशी थाटला ...

संसार मार्गस्थ होत असताना किरकोळ कारणावरून होणारी भांडणे विकोपाला गेली. त्यातच तौफिक याला हिनाचे यासीनबरोबरचे प्रेमसंबंध समजले.या कारणातून तो जास्तच तिच्याबरोबर भांडण करू लागला. तो हिनाला त्याचा नाद सोड संसार आपल्या दोघांना करायचा आहे असे समजावून सांगत होता. परंतु ती त्याचे काही एक ऐकत नव्हती. ती त्याला म्हणत होत होती की, तिचे लग्न तिच्या इच्छेविरूध्द तिच्या आईने लावून दिले आहे. हे ऐकून तर तौफिकच्या रागाचा पारा चढत होता. आधीच त्याचा स्वभाव हा रागीट आणि भांडखोर असल्याने पत्नी हिनाला तो मारहाण ही करू लागला. हिना ही यासीनच्या प्रेमात इतकी वेडी झाली होती की, तिला नवरा तौफिक हा नको होता. ती त्याचा तिरस्कार करू लागली होती. त्याला ती समजावूनच घेत नव्हती. ती जास्त करून आई अमिना हिच्याबरोबरच राहू लागली होती. तेथेच तिची प्रियकर यासीनसोबत भेट होत होती. अलिकडे तर ती नवऱ्याला सोडून प्रियकर यासीनसोबतच राहू लागली. तिच्या आईला ही त्या दोघांच्या प्रेमसंबंधाबद्दल माहिती होती. परंतु तिचे लग्न ठरविताना तिने ही गोष्ट जाणीवपूर्वक लपवली होती. आपली फसगत झाली आहे हे तौफिक याने ओळखले होते. हिना तर तौफिकला काहीच किमंत देत नव्हती. तिला तो नकोच होता. त्यामुळे तिने नवरा म्हणून कधी त्याला आपल्या अंगाला हात ही लावू दिला नाही. त्यामुळे त्याच्या नात्यातील वीण ही सैल होत चालली होती. पाच महिन्यापुर्वी गावात आईकडे ती राहयला गेल्यावर ती यासीनसोबत पळून गेली. ही गोष्ट ज्यावेळी तौफिकला समजली त्यावेळी त्याचे डोकच सणकले. आपली पत्नी प्रियकरासोबत पळून गावात त्याची होती नव्हती ती ही अब्रु गेली होती. ती पळून गेल्यावर हिनाच्या बहिणीच्या नवऱ्याने त्या दोघांचा शोध घेऊन त्यांना गावात आणले. त्यावेळी हे प्रकरण मिटविण्यासाठी गावातील पंच मंडळीची बैठक बसली. गावातील पंचानी या घटनेचा निवाडा करताना त्यानी हिनाचा आणि तौफिकचा समाजाच्या रितीरिवाजानुसार काडीमोड घेतला आणि त्याचवेळी हिनाचे लग्न यासीनसोबत लावून दिले. ही गोष्ट तौफिकच्या जिव्हारी लागली. बायकोच्या प्रेमप्रकरणाने वेगळेच वळण घेतले होते. या प्रकरणाचा निवाडा करताना पंच मंडळीनी यासीनला जबाबदार धरून त्याला शिक्षा करायला हवी होती असे तौफिकचे मत होते. पण उलटेच झाले होते. त्याची होती नव्हती इज्जत अब्रु या प्रकरणाने गेली.त्यामुळे त्या दोघावर त्याचा भंयकर राग होता. आपल्या बायकोने आपल्याशी तलाक घेऊन आपल्या समोरच प्रियकर यासीन सोबत राहु लागल्याने त्याच्या तळपायची आग मस्तकात गेली. खरे तर त्याने तिच्याशी तलाक घेतल्याने त्याचा तिचा काही काडीमात्र संबंध उरला नव्हता.पण त्याचे मन मात्र त्याला स्वस्थ बसु देत नव्हते. तो या घटनेनंतर दारूच्या जास्तच आहरी गेला. दारूच्या नशेत दिवसभर राहु लागल्याने कामावर ही तो जात नव्हता. त्याच्या डोक्यात किडच पडली होती. गावात त्याच्या घरापासून काही अंतरावर हिना ही प्रियकर यासीनसोबत राहत असल्याने त्याला काही सुचत नव्हते.त्याचा राग त्याला अनावर होत होता. मंगळवार दि.३० जानेवारी २०२४ रोजी रात्री ९च्या दरम्यान दारूच्या नशेत त्याने आपल्या घरातून कोयता घेतला आणि थेट तो हिना राहत असलेल्या घरात शिरला. त्यावेळी घरात हिना तिचा दुसरा पती यासीन आई अमिना हे होते. बाजुलाच अमिना याची दुसरी मुलगी आणि जावाई राहत होते. तौफिक हा दारूच्या नशेत घरात कोयता घेऊन शिरल्याने हिना ही गडबडली. रागाच्या भरात तौफिकने आपल्याकडील कोयत्याने तिला शिव्या माझा संसार उद्धवस्थ केलास काय म्हणत तिच्या गळयावर मानेवर आणि चेहऱ्यावर कोयत्याने सपासप वार केले. ती क्षणार्धातच जागेवरच ओरडत खाली रक्ताच्या थारोळ्यात पडली. त्यानंतर तौफिकने परत तिचा दुसरा नवरा यासीन बागोडे याच्याही गळयावर, मानेवर कोयत्याने वार केले. तो ही ओरडत जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्यांच्या ओरडण्याने त्यांना सोडवायला आलेल्या तिची आई अमिना आणि त्याच्या मोठया मुलीचा नवरा मुस्ताक मुल्ला हे आले असता तौफिकने त्याचेवर हल्ला केला.या हल्लयात ते दोघे ही गंभीर जखमी झाले. हिनाच्या घरातील आरडा ओरडा ऐकून शेजारचे लोक तेथे आल्यावर रक्ताने माखलेला कोयता त्यांना दाखवित तौफिक हा तेथून निघून गेला. या घटनेची माहिती कुणी तरी एगळी पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या दुहेरी हत्याकांडाने संपुर्ण गाव हादरून गेले. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची जवळपास माहिती अनेकांना होती. पोलीस निरीक्षक रविंद्र नायकवही आणि पोलीस उपनिरीक्षक सुमलता आसंगी यांनी घटनास्थळी दाखल होऊन घटनेची माहिती घेतली. घटनास्थळी पोलीसांनी डॉग स्कॉड आणि ठसेतज्ञांना पाचरण करून पंचनामा सुरू केला. या अगोदर पोलीसांनी अमिना बागोडे आणि मुस्ताक मुल्ला या दोघा गंभीर जखमीना उपचारासाठी अथणी येथील सरकारी दवाखान्यात दाखल केले. श्वान पथकाने घरापासून काही अंतरावर मार्ग दाखविला. ऐगळी पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी अथणी येथील सरकारी रुग्णालयात पाठविले. या घटनेतील संशयीत आरोपीची माहिती पोलीसांना मिळाल्याने त्याचा शोध सुरू केला. तो घटनास्थळावरून पळून जावून आपल्या घरात लपला होता. त्याला तेथून ताब्यात घेऊन ऐगळी पोलीस स्टेशनला आणले. तेथे त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने नाही होय करीत आपला गुन्हा कबुल केला. दुसऱ्या दिवशी बुधवार सकाळी घटनास्थळी अथणीचे पोलीस उपाधिक्षक विश्वनाथ जल्दे, गदग जिल्हा पोलीस प्रमुख बी.एन. न्यायमगौडा व बेळगावीचे प्रभारी अतिरिक्त जिल्हा पोलीस प्रमुख एम.एम बसर्गी यांनी भेट देवून या दुहेरी खूनाची माहिती माहिती घेतली. संशयीत आरोपी तौफिक बालेसाब कॅडी हा पोलीसांच्या ताब्यात होता. त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची पोलीसांनी फिर्याद मयत हिनाच्या नातेवाईकांच्या कडून घेतली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी हिना कौसर (वय १९) यासीन बागोडे (वय २१) याच्या दुहेरी खून प्रकरणी आणि अमिना बागोडे (वय ४५) त्याचा जावाई मुस्ताक मुल्ला याचेवर जीव घेणा हल्ला केल्याप्रकरणी तौफिक उर्फ बालेसाब कॅडी (वय २५) याच्या विरोधात आपीसी कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला अथणी येथील प्रथमवर्ग न्यायालयात पोलीसांनी हजर केले. मा.न्यायलयाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्यांच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पो.निरी.रविंद्र नायकवडी हे करीत आहेत. लग्नाअगोदरचे प्रेम हे सहसा कोणी विसरू शकत नाही. त्यातच मनाविरूध्द लग्न झाले तर मग काही विचारण्याची सोय नसते. विशेषता लग्न अगोदरचे प्रेम हे विसरत नाहीत. त्यांच्या लग्नानंतर ही त्याची ओढ ही प्रियकराकडेच असते. नेमकी तिच गोष्ट हिनाच्या बाबत घडली. लग्नानंतर ती प्रियकरासोबत पळून गेली याचा राग नवरा तौफिकला आला. या रागातूनच त्याने हे दुहेरी हत्याकांड घडविले असेच म्हणावे लागेल.

## सख्खा भाऊ पक्कावैरी झाला...

औसा तालुक्यातील तुंगी (बु) येथील योगेश बालाजी जाधव याचा त्याच्या सख्ख्या भावाने दोरीने गळा आवळून खून केला व त्याने गळफास घेतल्याची तक्रार दिली. तथापि तपासात वास्तव समोर आले व औसा पोलिसांनी योगेशचा सख्खा भाऊ व त्याच्या आईस अटक केली आहे. औसा तालुक्यातील तुंगी (बु) येथील योगेश जाधव याला दारूचे व्यसन होते, तो सतत दारू पित होता. तसेच दारू पिण्यासाठी पैशाची घरात मागणी करत होता. २७ जानेवारी रोजी त्याने असाच वाद घातल्यानंतर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास स्वतः च्या शेतात योगेश आणि सचिन जाधव, शशीकला जाधव यांच्यात वाद झाला. यावेळी सचिनने तिथेच पडलेल्या एका दोरीने योगेशचा गळा आवळला. या घटनेनंतर योगेशने आत्महत्या केली आहे अशी खबर सचिन जाधव यांनी औसा पोलिसांत दिली. मात्र, पोलिसांच्या तपासात सचिन जाधव यांच्या जबाबात बदल येत असल्याने पोलिसांना संशय निर्माण झाला पोलिसांनी या बावत अधिक चौकशी केली असता योगेशने गळफास घेवून आत्महत्या केली नाही तर त्याचा गळा आवळून खून केल्याचे उघड झाले. या प्रकरणी पोलिसांनी भाऊ सचिन व आई शशिकला यांच्या विर– रोधात खूनाचा गुन्हा दाखल केला. पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत लोंढे, पोलीस अंमलदार मोतीराम घुले, रामकिशन गुट्टे, दिनेश गवळी, सरवदे यांनी तपास केला.

## वाहयात गेलेल्या मुलापुढे बाप...

दोघेजण मोलमजुरी करून आपल्या संसाराचा गाडा चालवित असत. त्याचा १४ वर्षीय मुलगा विशाल बट्ट हा जवळच्याच एका शाळेत ८वीच्या वर्गात शिकायला आहे. विशालचा लहानपणापसूनच स्वभाव हा तसा खटयाळ आणि खोडकर असा असल्याने तो काही ना काही खोडया हा करीत असायचा. शाळेतील मुलीची छेड काढणे. घरी काही काम न करता वडिल विजय यांचा मोबाईल पाहणे असे तो करीत होता. त्याचे शाळेतील अभ्यासात अजिबात लक्ष नव्हते. उनाड मुलांच्या नादाला लागून तो सारखा शाळेला दांडया ही मारत होता. त्यामुळे मागे एकदा दोनदा त्याच्या वर्ग शिक्षकांनी विजय बट्ट यांना शाळेत बोलावून विशाल याचे पग्रती पुस्तक त्यांना दाखवून तो शाळेत कसा वागतो हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. आपला मुलगा विशाल हा शाळेत कच्चा आहे. त्याचे अभ्यासात लक्ष नाही हे त्यांना जरी माहित असले तरी आपला मुलगा वाईट मुलांच्या संगतीला लागून तो बिघडत चालला आहे हे त्यांना माहित नव्हते. त्यावेळी त्यांनी घरी आल्यावर विशाल याला मारहाण करून तु जर शाळेत अभ्यासात लक्ष नाही घातलास तर तुला मी काही ढिले सोडणार नाही असे सांगून त्याला नीट वागण्याची तंबी दिली होती. हल्ली ते सारखे विशालच्या वागण्याकडे लक्ष ठेवून होते.तरी ही विशाल हा शाळेला जातो म्हणून बाहेर फिरत होता. तो सकाळी शाळेला जातो म्हणून गेला की, संध्याकाळीच शाळा सुटतेवेळी घरात येत होता. त्यामुळे तो शाळेत गेला आहे असाच समज त्याच्या आई वडिलांचा होत होता. हल्ली तर त्याला मोबाईल पाहण्याचा नाद लागला होता. त्या मोबाईल वर तो अश्लिल फिल्म बघत असल्याचे त्याच्या वडिलांच्या लक्षात आले होते. त्यामुळे ते त्याला आपला मोबाईल घेऊ देत नव्हते. तरी ही विशाल हा वडिलांच्या माघारी मोबाईल घेऊन त्यामध्ये अश्लिल फिल्म बघत होता. त्याला सुधारण्याचा आणि चांगले वळण लावण्याचा त्यांनी बऱ्याच वेळेला प्रयत्न केला. परंतु त्याच्या वागण्यात काही फरक पडत नव्हता. त्यामुळे ते सारखे त्याच्यावर वैतागलेले असायचे. त्यातच हल्ली विशाल हा शाळेतील मुलीची छेड छाड काढत असल्याच्या तक्रारीही त्याच्या पर्यत आल्या होत्या. त्याचे मोबाईलचे व्यसन ही सुटत नव्हते.त्यांनी त्याला जरी मोबाईल दिला नाही तर तो सपुर्ण घर डोक्यावर घेऊन दंगा घालत होता. त्यावेळी त्याची आई त्याच्या चुकावर पांघरून घालून त्याला नवऱ्याचा मोबाईल बघायला देत होती. नेमकी हिच चुक तिला नंतर महागात पडली. तो जास्तच बिघडत चालला होता. त्याला किती ही समजावून सांगितले तरी तो काही सुधारत नव्हता. त्यामुळे विजय बट्ट हे ही काही करू शकत नव्हते. विशाल हा अभ्यासात लक्ष देत नाही त्याचे मार्क्स ही चांगले नाहीत म्हणून शाळेतील मुख्याध्यापकांनी आणि वर्ग शिक्षकांनी विजय बट्ट यांना बोलावून पुढील वर्षी त्याला तुम्ही दुसऱ्या शाळेत घाला अशी सुचना दिली होती. त्यामुळे विजय बट्ट यांना काही सुचत नव्हते. त्याच्यामुळे घरात त्याची पत्नी किर्ती बरोबर ही भांडणे होत होती.मुलग्याचा खोडकरपणा त्याला वाईट वळणावर घेऊन जात आहे हे त्यांनी तिच्या ही निदर्शनास आणून दिले होते. परंतु शेवटी ती त्याची आई असल्याने नवऱ्याने काही सांगितले तरी मुलाची चुक पदरात घालून ती त्याला पाठीशी घालत होती. हल्ली तो मुलीची छेड छाड काढत असल्यान वडिल विजय बट्ट हे त्याला स्वत: शाळेत सोडायला जात होते. शनिवार दि.१३ जानेवारी रोजी ते त्याला आपल्या बाईकवर बसवून शाळेत सोडून आले. परंतु त्या दिवशी संध्याकाळ पर्यत विशाल हा काही शाळेतून लवकर घरी परत आला नाही म्हणून ते आणि त्याची पत्नी हे दोघेजण मिळून विशालचा शोध घेत होते.रात्री उशिरापर्यत तो घरी परत आला नाही दुसऱ्या दिवशी ही तो घरी परत आला नाही म्हणून शेवटी विजय बट्ट यांनी आपला १४ वर्षीय मुलगा विशाला बट्ट हा दि.१३ जानेवारी रोजी शाळेला गेला तो दोन दिवस झाले तरी घराकडे परत आला नाही. तो बेपत्ता झाला आहे अशी तक्रार जवळच्याच जोडभावी पोलीस ठाण्यात दिली. शाळकरी मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल झाल्याने पोलीस या घटनेचा सर्व ॲगलनी तपास करीत होते.घटनेच्या दिवशी स्वत:विजय बट्ट यांनी विशालला शाळेत सोडले असे ते पोलीसांना सांगत असल्याने विशालचा शोध घेत असताना पोलीसांच्या संशयाची सुई ही विजय बट्ट याच्याकडेच फिरत होती. कारण घटनेच्या दिवशी विशाल हा शाळेला आलेला नव्हता.तो त्या दिवशी शाळेत गैरहजर असल्याची नोंद वर्ग शिक्षकांनी केली होती. मग तो शाळेला गेला नाही तर मग गेला कुठे? असा प्रश्न पोलीसाच्या समोर उभा राहिला.विजय बट्ट याच्याकडे पोलीस चौकशी करीत असताना पोलीसांना ते उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याचे पोलीसांच्या लक्षात आले.त्यांनी विजय बट्ट यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे घटनेच्या दिवशीचा सगळा घटनाक्रम वदवून घेतला. त्यावेळी विजय बट्ट यांनी आपणच विशालचा खून केल्याचे मान्य करून आपला गुन्हा कबुल केला. विशालला मारून आपण त्याचा मृतदेह एका निर्जन स्थळी लपवून ठेवल्याचे त्यांनी सांगितले. घटनेच्या दिवशी विजय बट्ट हे विशालला शाळेत सोडायला जात असताना त्याच्या डोक्यात त्याला मारण्याचा प्लॅन चालला होता. मुलगा आपल्याला त्रास देत आहे. त्याच्यामुळे आपली समाजात बदनामी होत आहे. त्याला आता मारून टाकले पाहिजे नाही तर त्याचेत काही केल्या सुधारणा ही होणार नाही मग त्याचे जगून तर काय फायदा होणार असा त्यांनी विचार केला. शाळेत जात असताना त्यांनी विशालला थम्सअप पिणार का? असे विचारले. त्यावर विशालने हो म्हटल्यावर त्यांनी दुकानातून एक थम्सअप विकत घेतले. त्या थम्सअपमध्ये त्यांनी त्याच्या नकळत विष मिसळले. काही अंतरावर एका निर्जन स्थळी गेल्यावर त्यांनी त्याला थम्सअप पिण्यास दिले. आजुबाजूला कुणी नसल्याचे बघून त्यांनी त्याला थम्सअप पाजले. ते थम्सअप पिल्यावरी विशालला उलटया झाल्या.काही क्षणात त्याचे डोळे पांढरे झाले. तो आपले दोन्ही हात गळ्याभोवती घेऊन उलटया करीत होता. हे सगळे विजय बट्ट निर्विकार चेहऱ्याने त्याच्याकडे बघत होते. त्यांना त्याची जरा देखील माया आली नाही काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. विशालाचा जागीच मृत्यू झाला.त्याला तेथील एका झाडाझुडूपात टाकून आल्या पावली विजय बट्ट हे तेथून निघून गेले. घरी येवून त्यांनी पत्नी आणि शेजार पाजाऱ्या समोर विशाल हा बेपत्ता झाल्याचा कांगवा केला आणि तो बेपत्ता झाल्याची तक्रार जोडभावी पोलीस स्टेशनला दिली. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना संशयची सुई त्याच्याकडे फिरत असल्याने पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन या घटनेचा उलगडा केला. विजय बट्ट यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलीसांनी विजय यांनी सांगितलेल्या ठिकाणावरून विशालचा मृतदेह ताब्यात घेतला. तो कुजत चालला होता. मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी सोलापूरातील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला.या घटनेची लेखी फिर्याद जोडभावी पोलीस स्टेशनला मयत विशाल याची आई किर्ती बट्ट (वय ३०) रा.भवानी पेठ यांनी दिल्याने पोलीसांनी विशाल विजय बट्ट (वय १४) याच्या खून प्रकरणी त्याचे वडिल विजय बट्ट (वय ३५) याच्या विरोधात जोड भावी पोलीस स्टेशनमध्ये भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल केला.पोलीसांनी विजय बट्ट यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना २५ जानेवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली बाईक आणि विष व थम्सअपची बाटली ताब्यात घेतली. या घटनेचा पुढील तपास जोडभावी पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत.मुले किती जरी हट्टी आणि खोडकर असली तरी त्यांना सांभाळून घ्यावे लागते.त्याना सुधारण्याची संधी ही दयावी लागते. परंतु हिच मुले जर त्याच्या स्वभावाने जर डोईजड होऊ लागले तर त्याचा विपरीत परिणाम असा होतो. हेच या घटनेवरून दिसून येते.

## क्रिकेट सामन्यानंतर मोठा ...

या घटनेमुळे हल्लेखोर कमावते अथवा नोकरी, व्यवसायाच्या वाटेवरील तरुण जेलमधे जातात. त्यांच्यादेखील परिवारावर दुखा:चा डोंगर कोसळतो. जेलमधे जाणाऱ्या तरुणांची लग्नकार्य जुळण्यास अडचणी येतात. मात्र तारुण्याच्या जोशात कृत्य घडून जाते आणि त्याचे परिणाम जीवनभर भोगावे लागतात. अशा घटना यापुर्वी कोल्हापूर जिल्ह्यात देखील घडल्या आहेत. जळगाव जिल्ह्याच्या चाळीसगाव येथे देखील क्रिकेटच्या वादातून झालेल्या हल्ल्यात एका पोलिस कर्मचाऱ्याचा खून झाला.

शुभम अनिल अगोणे हा चाळीसगाव येथील तरुण मुंबई पोलिस दलात कार्यरत होता. तो आपल्या मुळ गावी चाळीसगाव येथे काही दिवसांसाठी सुट्टीवर आला होता. सुटीवर आलेल्या शुभमला क्रिकेट खेळण्याची आवड होती. चाळीसगाव शहरात साहजीकच त्याचा मित्रपरिवार होता. क्रिकेटची आवड असलेल्या शुभमच्या मित्र–परिवाराची मित्रा एंटरप्रायजेस क्रिकेट टीम या नावाने टीम होती. या टीममधे शुभम अनिल अगोणे याच्यासोबत अक्षयअगोणे, शुभम तुकाराम बोराडे, विनोद, वैभव, सुमित, राहुल व इतर मित्रांचा समावेश होता. यासोबतच एस.के. गृप टीम या नावाने दुसरी टीम देखील कार्यरत होती. सौरभ कोळी, सिद्धांत कोळी, वसंत बच्छाव असे तरुण या एस.के. गृप टीममधे सहभागी होते. १४ जानेवारी रोजी चाळीसगाव शहराच्या भडगांव रोडवरील जलाराम मार्बलनजीक मैदानावर क्रिकेटचा सामना आयोजीत करण्यात आला होता. या क्रिकेट सामन्यात शुभम हा देखील मित्रा एंटरप्रायजेस टीमकडून सहभागी झाला होता. शुभम आणि त्याचा मित्रपरिवार १४ जानेवारी रोजी आयोजीत करण्यात आलेल्या क्रिकेट टुर्नामेंटमधे सेमी फायनलमधे खेळण्यासाठी गेला होता. सकाळी अकरा वाजेच्या सुमारास शुभमचा सहभाग असलेल्या मित्रा एंटरप्राईज क्रिकेट टिमची एस. के. गृप या टिमसोबत सेमी फायनल मॅच झाली. या सेमी फायनलमधे शुभमचा सहभाग असलेला मित्रा एंटरप्रायजेसचा संघ जिंकला. विरुद्ध टीम एस.के. गृपचा पराभव झाला. या पराभवाचे शल्य एस.के. गृपमधील खेळाडूंना बोचू लागले. त्यामुळे या पराभूत टीममधील सौरभ कोळी, सिध्दांत कोळी, वसंत बच्छाव व इतर खेळाडूंनी शुभम व त्याच्यासोबतच्या खेळाडूंसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. बघता बघता एस.के. गृप या टिमचे खेळाडू मित्रा एंटरप्रायजेस या टीममधील खेळांडूना शिवीगाळ करु लागले. दरम्यान एस.के. गृपमधील खेळाडू वसंत बच्छाव याने चाकू काढून शुभमसह त्याच्या साथीदार खेळाडूंना जीवे मारण्याची धमकी दिली. शुभमने सावधगिरी बाळगत सर्वांना बाजूला नेत समजूतदारीने घेण्याचा सल्ला दिला. खेळ म्हटला म्हणजे जय पराजय हा होतच असतो असे म्हणत विरुद्ध टीममधील हिंसक वृत्तीच्या खेळाडूंना समजावण्याचा प्रयत्न केला. सौरभ कोळी, सिद्धांत कोळी यांच्याविरुद्ध पोलिस स्टेशनला मारामारीचे गुन्हे दाखल असल्याचे माहिती असल्यामुळे शुभम व त्याच्या मित्रांनी नमते घेत कसाबसा वाद मिटवत घरी जाण्यात धन्यता मानली. दुपारी चार वाजेच्या सुमारास फायनल मॅच खेळण्यासाठी पुन्हा दोन्ही टीमचे खेळाडू मैदानावर आले. फायनल मॅचमधे देखील मित्रा एंटरप्रायजेस या टीमचाच विजय झाला. फायनल मॅच जिंकल्यामुळे बक्षीस घेऊन विजयाचा जल्लोष करत शुभम व त्याचे विजयी साथीदार खेळाडू घराकडे निघाले. हा प्रकार पराजीत खेळाडूंना बघवला गेला नाही. विजयी खेळाडू घराकडे जात असतांना वाटेत घाटरोडवर सौरभ कोळी, सिध्दांत कोळी, अण्णा कोळी, वसंत बच्छाव, पृथ्वी कुमावत व इतरांनीशुभमसह त्याच्या मित्रांकडे खुनशी नजरेने बघून त्यांच्या दिशेने दगडफेक सुरु केली. परिस्थिती बिघडत असल्याचे बघून शुभम आणि त्याच्यासोबतचे इतर सर्व विजयी खेळाडूंनी तेथून जीव वाचवण्यासाठी तेथून पलायन केले. पाटणादेवी रस्त्यावरील पीर मुसा कादरीबाबा दर्ग्याच्या बाहेर असलेल्या बाकावर सर्वजण कसेबसे आले. तेथील बाकावर बसून सर्वानी सुटकेचा निश्वास घेतला. मात्र त्यांचा जीवघेणा संघर्ष अजून थांबला नव्हता. शुभम अगोणे, सचिन बोराडे, राहुल अगोणे, भुषण अगोणे, अक्षय अगोणे, शुभम बोराडे, आकाश आवारे व इतर सर्वमित्र एकत्रीतथांबले असतांना त्यांच्या मागावर असलेले हल्लेखोर त्याठिकाणी आले. आहिल्यादेवी चौकाकडून सायंकाळी साडेपाचवाजेच्या सुमारास रिक्षा आणि मोटार सायकलने सौरभ अण्णा कोळी, सिध्दांत अण्णा कोळी, वसंत राजु बच्छाव, अण्णा उर्फ आनंदा चिंधा कोळी, पृथ्वी कुमावत, चित्रा कैलास मोरे, जय मोरे व इतर हल्लेखोर शुभम आणि त्याच्या सोबत असलेल्या मित्रांच्या दिशेने आले. आलेल्या वाहनातून खाली उतरताच सर्वजण शुभमसह त्याच्यासोबत असलेल्या सर्वांच्या दिशेने झेपावले. सौरभ कोळी याच्या हातात तलवार,वसंत बच्छाव याच्या हातात चॉपर,सिध्दांत कोळी याच्या हातात क्रिकेट बॅट होती. पृथ्वी कुमावत आणि त्याच्यासोबत असलेल्या इतरांच्या हातात क्रिकेटचे स्टंप होते. अण्णा कोळी व चित्रा मोरे या दोघांनी शुभमसह त्याच्या सोबत असलेल्या सर्वांकडे बोट दाखवत यांना मारा, यांच्या अंगात खुप मस्ती आली आहे असे म्हणत चिथावणी दिली. सौरभ कोळी याने शुभमचे चुलत काका आनंद अगोणे यांच्यावर तलवारीने हल्ला केला. तो हल्ला आनंद अगोणे यांनी उजव्या हाताने अडवला. त्यामुळे त्यांच्या बोटासह अंगठ्याला मार लागला. काही समजण्याच्या आत सिद्धांत कोळी याने आनंद अगोणे यांच्या डोक्यात बॅटने हल्ला केला. याचवेळी वसंत बच्छाव याने त्याच्या हातातील चॉपरने शुभमवर जोरदार हल्ला केला. चॉपरच्या हल्लयात शुभम जखमी झाला. त्यामुळे त्याला काही सुचेनासे झाले. त्याचवेळी पृथ्वी कुमावत, जय मोरे व इतरांनी हातातील स्टंपने शुभमवर हल्ला करुन त्याला आणखी जखमी केले. शुभम आणि त्याचे चुलत काका आनंद अगोणे या दोघा जखमींना वाचवण्यासाठी रोहीत सरसावला. दोघांचा बचाव करण्यासाठी रोहीत पुढे आल्याचे बघून वसंत बच्छाव याने त्याच्या छातीवर चॉपरने वार केला. अशा प्रकारे रोहीत हा देखील जखमी झाला. हा जीवघेणा हल्ला होत असल्याचे बघून शुभमसोबत असलेले काही मित्रांनी घटनास्थळावरुन आपला जीव वाचवण्यासाठी पलायन केले. झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात शुभम रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडून असतांना देखील सौरभ कोळी व काहीजण त्याला स्टंपसह बॅटने मारहाण करतच होते. या घटनेची चाळीसगाव शहर पोलिस स्टेशनला माहिती समजली. माहिती मिळताच चाळीसगाव विभागाचे अप्पर पोलिस अधिक्षक रमेश चोपडे, सहायक पोलिस अधिक्षक तथा डीवायएसपी अभयसिंह देशमुख,पोलिस निरीक्षक संदीप पाटील आदी अधिकाऱ्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. पोलिस पथक घटनास्थळी आले असता त्यांना तेथील हल्ल्याचे प्रत्यक्ष दर्शन घडले. जखमी शुभम जमीनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता तरी देखील सौरभ कोळी व त्याचे साथीदार त्याला क्रिकेटच्या स्टंप व बॅटने मारहाण करतच होते. पोलिस आल्याचे समजल्यानंतर मारेकरी तेथून पळून जावू लागले. मात्र सौरभ कोळी, वसंत बच्छाव, चित्रा उर्फ जयश्री मोरे हे तिघे पोलिसांच्या तावडीत सापडले. या तिघांना पोलिसांनी आपल्या ताब्यात घेत जखमी शुभमला होणारी मारहाण थांबवली. जखमींना तातडीने नजीकच्या देवरे हॉस्पीटलमधे वैद्यकीय उपचारार्थ दाखल करण्यात आले. याठिकाणी डॉक्टरांनी शुभम यास मयत घोषित केले. बचावलेले जखमी आनंद अगोणे व रोहीत बोराडे यांच्यावर देवरे हॉस्पीटलमधे पुढील उपचार सुरु करण्यात आले. जखमी आनंद शिवाजी अगोणे याने देवरे हॉस्पीटलमधे उपचरादरम्यान पोलिसांना दिलेल्या जवाबानुसार शुभमच्या हत्येप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. सौरभ अण्णा कोळी, अण्णा उर्फ आनंदा चिंधा कोळी, सिद्धांत अण्णा कोळी, वसंत राजुबच्छाव, जय कैलास मोरे, पृथ्वी कुमावत, चित्रा उर्फ जयश्री कैलास मोरे व इतर नावे माहिती नसलेले तिन ते चार हल्लेखोर अशा सर्वांविरुद्ध हा खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होण्यापुर्वी घटनास्थळावरुन ताब्यात घेण्यात आलेल्या सौरभ कोळी, वसंत बच्छाव आणि चित्रा उर्फ जयश्री मोरे अशा तिघांना अटक करण्यात आली. तपासा दरम्यान अजून तिघा संशयीत आरोपींची नावे निष्पन्न झाली. विष्णू कोळी, अमोल कोळी आणि राहुल कोळी अशी त्या तिघांची नावे आहेत. या तिघांपैकी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विष्णू कोळी यास जामनेर येथून ताब्यात घेत अटक केली. अमोल कोळी, अण्णा कोळी, चित्रा मोरे, जय मोरे, पृथ्वी कुमावत, राहुल कोळी, सौरभ कोळी, सिद्धांत कोळी, वसंत बच्छाव, सौरभ उर्फ विष्णू नेवरे (कोळी) अशी या गुन्ह्यात निष्पन्न झालेल्या संशयीतांची नावे आहेत. फरार संशयीत आरोपींचा शोध सुरु आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संदिप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक सागर ढिकले व त्यांचे सहकारी पो.कॉ. प्रकाश पाटील, पोलिस नाईक तुकाराम चव्हाण करत आहेत.

### आगामी सर्वधर्मिय सण उत्सवांत पोलिस राहणार अलर्ट व एक्शन मोडवर

# उत्सवादरम्यान शहरातील शांतता कायदा सुव्यवस्था भंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार–मधुकर पांडे



**मिरा–भाईंदर/प्रतिनिधी**

मीरा भाईंदरचे प्रथम माजी राज्यमंत्री वरिष्ठ नगरसेवक महाराष्ट्र एनसीपी प्रदेश जनरल सेक्रेटरी डॉ. आसिफ शेख यांच्या नेतृत्वात मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित बुद्धिजीवी नागरिकांनी पोलिस कमिशनर मधुकर पांडे यांची भेट घेऊन शहरांत कोणतीही मोठी घटना होऊ न देता योग्य रीतीने पोलिस बंदोबस्त ठेऊन शांतता कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करुन आगामी दोन महिन्यात येणारे सर्वधर्मिय सण व उत्सवाच्यावेळी पोलिसांनी आधीच खबरदारी काळजी घेऊन अलर्ट राहुन पुरेसा पोलिस बंदोबस्त तैनात ठेवावा अशी मांगणी केली. शहरातील शांती कायदा व सुव्यवस्थांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ केली जाणार नाही असे आश्वासन सीपी मधुकर पांडे यांनी मुस्लिम शिष्ठमंडळाला यावेळी दिले. मीरा भाईंदर शहरात मागच्या आठवड्यात दोन समुदायांमध्ये झालेल्या वाद–विवाद आणि संघर्षाने शहरातील शांती कायदा व सुव्यवस्थाची परिस्थिती गंभीर झाली होती. पोलिस प्रशासनाने अत्यंत कुशलतेने परिस्थिती हाताळली होती. मुस्लिम समाजाच्या डॉ. आसिफ शेख यांच्या नेतृत्वातील शिष्ठमंडळात मौलाना मुफ्ती अबूबकर, सलीम अब्बास खान, कैप्टन सलीम मंसूरी, मुंबई हायकोर्ट वकील अॅड. सना देशमुख, रफीकभाई पटेल, मुर्तुजा कांचवाला, तैयबभाई चित्तौडवाला, हाजी नोमान खान, हाजी तौराबभाई, हाजी फरमानभाई, शाहबाज शेख, तनवीर शेख आदी मान्यवर उपस्थित होते. मीरा भाईंदर शहरात २१ ते २४ जानेवारीला झालेल्या अशांततेनंतर २६ जानेवारी पासून रोजी पुन्हा शांती प्रस्थापित करण्यात पोलिसांना यश मिळविल्याबद्दल पोलिस प्रशासनाचे मुस्लिम समाजाने कौतुक करुन राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांचे अभिनंदन देखील केले. डॉ. आसिफ शेख यांनी पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांना सांगितले की आम्ही आमच्या आजोबा पणजोबा वाडवडीलापासून मीरा भाईंदर शहरातील स्थानिक रहिवासी असून मीरा भाईंदर शहर हे मिनी इंडिया भारत असून या शहरात देशाच्या विविध राज्यातून गांवातूनत काम धंदा नोकरीसाठी मोठ्या प्रमाणावर लोक येथे येऊन स्थायीक झालेले असून सर्वजण एकमेकांच्या सण उत्सवात प्रेम आनंदाने सहभागी होतात. गेल्या ५० वर्षात मीरा भाईंदर शहरात एक देखील दंगल झालेली नाही. सन १९९२ ला मुबई महाराष्ट्र व देशातील अन्य भागात जेव्हा दंगली झाल्या होत्या त्यावेळी मीरा भाईंदर शहरात शांतता होती. मीरा भाईंदर शहर शांतता प्रिय असून काही असामाजिक असंतुष्ट लोक असे कृत्य करून अशांतता पसरवित असतात. आगामी एक दोन महिन्यांनी महाशिवरात्री रमजान गुडफ्रायडे रमजान ईद रामनवमी डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती असे सर्वधर्मिय सण व उत्सव असल्याने अगोदर पासूनच पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवावा जेणे करून शहरात असामाजिक असंतुष्ट लोकांचा योग्य वेळी ताब्यात घेऊन कठोर कारवाई करता येईल. पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी यावेळी मुस्लिम समाजाला आश्वासन दिले की कुणाच्याशी दबावाला बळी न पडता पोलीस निपक्षपणे जो कोणी दोषी असेल त्यावर कडक कारवाई केली जाईल. यांच्या शहरा आणि निवासातील स्थानिक लोकांसोबत मोहब्बत आणि भाईचार्याचे वातावरण आहे.

मिरा भाईंदरच्या शांती कायदा व सुव्यस्था बाबत गेल्या आठवड्यात डॉ आसिफ शेख यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देवगिरी बंगल्यावर मुस्लिम समाजातील प्रतिष्ठितांची बैठक घेऊन परिस्थिती समजुन घेऊन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस डीजीपी रश्मी शुक्ला सीपी मधुकर पांडे मनपा आयुक्त संजय काटकर यांना निर्देश देऊन एकतर्फी कारवाई न करता जो दोषी असेल त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

# कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे महिला सबलीकरणास प्रोत्साहन मिळेल –अनमोल सागर




**लातूर/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत स्तरावर १५वा वित्त आयोगातून आरोग्य, शिक्षण व उपजीविका या अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळा सुरु आहेत. या प्रशिक्षणामुळे महिला सबलीकरणास प्रोत्साहन मिळेल. तसेच महिलांना रोजगार मिळण्यास आणि व्यवसायाभिमुख कर्ज मिळण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी केले.लातूर तालुक्यातील कृष्णा नगर येथील ग्रामपंचायतीमध्ये सुरु असलेल्या प्रशिक्षणास बुधवारी भेट दिल्यानंतर श्री. सागर बोलत होते. यावेळी प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित महिलांना त्यांनी मार्गदर्शन केले.कौशल्य विकास प्रशिक्षण घेतल्यामुळे महिला आत्मनिर्भर होवून समृध्द जिवनाची वाटचाल करु शकतील. या प्रशिक्षणामुळे महिला लाभार्थींना रोजगार मिळण्यास मदत होईल. तसेच व्यवसायाभिमुख कर्ज सहजरित्या महिलांना उपलब्ध होवू शकेल, असे श्री. सागर यांनी सांगितले. कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी प्रशिक्षणामुळे होणारे फायदे सांगून त्यांना बँकेमार्फत मिळणाऱ्या कर्जाबाबत माहिती दिली. यावेळी दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, सौदर्य प्रसाधने निर्मिती, बेकरी पदार्थ निर्मिती, चॉकलेट पदार्थ निर्मिती व उद्योजकता विकास प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण पुस्तिका व नॅशनल स्कील डेव्हलपेंट कार्पोरेशन पुरस्कृत संस्थेचे प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. गट विकास अधिकारी तुकाराम भालके यांनीही कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यशाळेतील उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. तसेच सरपंच लिंबाबाई ज्ञानोबा जाधव यांनी कार्यक्रमामध्ये सहभाग नोंदवून उपस्थितांचे आभार मानले.

# विरारमध्ये १० किलोच्या गांजासह आरोपीला अटक

**विरार/प्रतिनिधी**

गांजा तस्कराला पकडण्यात विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाला यश आले आहे. गेल्या गुरुवारी गांजाची तस्करी होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी एका आरोपीला अटक केली. आरोपींनी प्लास्टिकच्या पिशवीत १० किलो गांजा भरून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी चंदनसार रोडवर आले होते. या गांजाची किंमत २ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाला ०१/०२/२०२४ रोजी दुपारी २.३० वाजता विरार पोलीस स्टेशनच्या हद्दीतील चंदनसार रोडवरील विरार वजनकाट्याजवळ एक व्यक्ती मृतावस्थेत आढळल्याची गुप्त माहिती मिळाली. तो गांजाची तस्करी करण्यासाठी येणार होता. माहिती मिळताच वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व आदेशानुसार विरार पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीत आरोपीने आपले नाव विकास मौर्य असल्याचे सांगितले, तो मुंबईतील अंधेरी




भागातील रहिवासी आहे. आरोपीच्या झडतीत त्याच्याकडून १० किलो गांजा जप्त करण्यात आला. त्याची एकूण किंमत २,००,००० रुपये असल्याचे सांगण्यात आले. अधिक तपास करताना, विरार पोलिसांनी अंमली पदार्थ आणि सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा, १९८५ च्या कलम ८(अ), २०(ब), ळळ(बी) नुसार गुन्हा दाखल केला आहे. विरार पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त सुहास बवचे यांच्या मार्गदर्शनाखाली मीरा भाईंदर वसई, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र देशमुख (विरार विभाग), वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय पवार, पोलीस निरीक्षक (गुन्हे शाखा) सुशीलकुमार शिंदे आणि गुन्हे शोध पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे, पु.ह.सचिन लोखंडे, संदीप जाधव, विशाल लोहार, इंद्रनील पाटील, संदीप शेरमाळे, संदीप शेळके, मोहसीन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पूरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांच्यासह विरार पोलीस ठाण्यातील पथकाने ही कामगिरी यशस्वीपणे पार पाडली.

# पशूसंवर्धन विभागामार्फत लाभार्थ्यांना शेळयांचे वाटप



**पालघर/प्रतिनिधी**

आज जिल्हा परिषद पालघर मधील पालघर तालुक्यातील जिल्हा वार्षिक योजना–आदिवासी उपयोजना (१०+१) शेळी गट वाटप या योजनेत निवड झालेल्या १४ लाभार्थींना पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी महामंडळ यांच्या मार्फत शेळ्या वाटप करण्यात आल्या. जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, कृषी पशुसंवर्धन समिती सभापती संदीप पावडे, जिल्हा परिषद सदस्या नीता पाटील, विनया पाटील पंचायत समिती सदस्य तुषार पाटील, बाळू मढवी, डॉ प्रकाश हसनाळकर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समिती पालघर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. ७५% अनुदान असलेली ही योजना ७८,२३१ इतक्या रकमेची असून २५% लाभार्थी हिस्सा लाभार्थ्यांना जमा करावा लागतो तर ५८,६७३ इतकी रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होते, असे या योजनेचे स्वरूप आहे. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम यांनी ११ शेळ्यांपासून २ वर्षात ३० शेळ्या ची पैदास तयार करून उत्तम उदर निर्वाह करण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच या शेळ्यांची जतन व्यवस्थित करून चांगले उत्पन्न घेऊन एक आदर्श समाजासमोर ठेवा आणि शेळीसोबत आपल्या प्रत्येक जनावरांचा विमा उतरवा, असे आवाहन अध्यक्ष प्रकाश निकम यांनी केले.

सभापती संदीप पावडे यांनी शेळ्यांपासुन मांस विक्री करून उत्पन्न वाढ होऊन कुटुंब स्वयंपूर्ण होऊ शकते याबबत माहिती दिली. विनया पाटील यांनी बोट, हालोली, सातीवली भागातील निवड झालेल्या लाभार्थ्यांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. नीता पाटील यांनी गोवाडे भागातील पशुपालकांना शेळी पालन बाबत माहिती दिली, तसेच याबाबत कुठलीही समस्या आल्यास आम्हाला संपर्क करा असे सांगितले. डॉ प्रकाश हसनाळकर यांनी शेळ्यांना वेळोवेळी ppr लसीकरण बाबत माहिती दिली. डॉ. राहुल संखे यांनी शेळ्या सर्दी नसलेल्या, कासदाह नसलेल्या निरोगी शेळ्याची कशी निवड करावी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राहुल संखे, पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती पालघर, डॉ. शिल्पा कारगिरवार, डॉ. स्नेहा पनीकर, अनंता पाटील पशुधन पर्यवेक्षक व लाभार्थी उपस्थित होते.

# महात्मा गांधीजींप्रमाणे स्वयंशिस्त, सत्य व प्रामाणिकपणा अंगिकारा – इति पाण्डेय

### गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या १२ दिवसीय ग्राम संवाद सायकल यात्रेस आरंभ



**जळगाव/प्रतिनिधी**

महात्मा गांधीजींप्रमाणे स्वयंशिस्त, सत्य आणि प्रामाणिकपणाच्या मार्गाने चालले तर, आपण खरे असल्याचे आपल्याला सिद्ध करण्याची आवश्यकता भासत नाही. खोट्याचे अनेक चेहरे असतात परंतु सत्याचा एकच चेहरा असतो असे म्हटले जाते. गांधीजींच्या सहज सोप्या तत्त्वज्ञानाचा अंगिकार आपण करावा' असे मोलाचे विचार रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक (DRM) इति पाण्डेय यांनी व्यक्त केले. महात्मा गांधी पुण्यतिथी (हुतात्मा दिनी, दि. ३० जानेवारी) निमित्ताने स्वस्थ समाज व सामाजिक समरसता निर्माण करण्याच्या उद्देशाने समाज प्रबोधनासाठी व गांधी विचार प्रचार–प्रसारासाठी गांधी रिसर्च फाऊंडेशनतर्फे ग्राम संवाद सायकल यात्रा आयोजण्यात आली या यात्रेस त्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आरंभ झाला. गांधी तीर्थ येथील या विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. सहभागी सायकल यात्रींसह उपस्थितांना अशोक जैन यांनी स्वच्छता संबंधीत प्रतिज्ञा दिली. यावेळी व्यासपीठावर या कार्यक्रमास जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे अध्यक्ष तथा गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त अशोक जैन, गांधी रिसर्च फाउंडेशनच्या डॉ. गीता धर्मपाल, डॉ. अश्विन झाला यांची उपस्थिती होती. माझ्या व्यक्तीगत जीवनात मी महात्मा गांधीजींच्या अनेक तत्त्वांचा अंगिकार करत असते या बाबत सांगताना त्या म्हणाल्या की, सकाळी माझ्या दिवसाची सुरुवात प्रार्थनेने होते. आपल्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी वाम मार्गाचा अवलंब न करता मेहनत व प्रामाणिकपणा खूप महत्त्वाचा ठरतो. या यात्रेच्या माध्यमातून असंख्य लोकांपर्यंत चांगला संदेश तुम्ही घेऊन जावे, रस्त्याने सायकल चालवितांना सुरक्षीतपणे सायकल चालवावी असेही आवाहनही इति पाण्डेय यांनी केले. या सायकल यात्रेत विविध राज्यातील आणि स्थानिक अशा ४० स्वयंसेवकांचा सहभाग आहे. १२ दिवसांच्या या यात्रेच्या माध्यमातून हजारो विद्यार्थी, शिक्षक, महिला व नागरिकांशी संवाद साधला जाईल. जळगाव जिल्ह्याच्या दक्षिण–पूर्व भागातील सात तालुक्यातून जवळजवळ ३५० किमीचा प्रवास या यात्रेचा असणार आहे. यात्रेत शाळा – महाविद्यालयात दोन दैनंदिन कार्यक्रम असतील तर रात्री मुक्कामाच्या ठिकाणी जनजागृतीबाबत जाहीर कार्यक्रम देखील संपन्न होणार आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या व प्रजासत्ताक अमृत महोत्सवी वर्षाच्या औचित्याने तयार करण्यात आलेली प्रदर्शनी कार्यक्रमांच्या ठिकाणी मांडली जाणार आहे. निरोगी, सशक्त समाजाच्या निर्मितीच्या उद्देशाने या यात्रेत प्रबोधन करण्यात येणार आहे. सूत्रसंचालन दीपक मिश्रा यांनी केले.

# मुंबईत सहा ठिकाणी बॉम्ब ठेवल्याची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबईत सहा ठिकाणी बॉम्ब ठेवले असल्याचा संदेश मुंबई वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षाला प्राप्त झाला आहे. याबाबत एएनआयने माहिती दिली आहे. मुंबई वाहतूक पोलीस नियंत्रण कक्षाला अज्ञात व्यक्तीकडून धमकीचा संदेश आला. संपूर्ण मुंबईत सहा ठिकाणी बॉम्ब ठेवण्यात आल्याचे संदेशात म्हटले आहे. या संदेशानंतर मुंबई पोलीस आणि इतर यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. मेसेज पाठवणाऱ्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहे, असं मुंबई पोलिसांनी म्हटलं असल्याचं वृत्त एएनआयने दिलं आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईसह देशभरातील विविध शहरांत बॉम्ब हल्ले होण्याची धमकी दिली जात आहे. तसंच, विमानात बॉम्ब ठेवल्याच्याही धमक्या मिळाल्या होत्या. परंतु, चौकशीअंती हे फोन बोगस असल्याचं स्पष्ट झालं होतं. संदेशाचीही चौकशी सुरू आहे.

**जिल्हा परिषद, पालघर**

**बांधकाम विभाग, मुख्या. जव्हार, जिल्हा परिषद पालघर,**

**E-Procurement निविदा सूचना क्रमांक २५, २६ व २७**

ई–निविदेद्वारे निविदा सुचना क्रमांक २५,२६ व २७ सन २०२३–२४ अन्वये बांधकाम विभाग जिल्हा परिषद, पालघर यांच्या अधिनिस्त कामे http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

| सही/– | सही/– |
|---|---|
| कार्यकारी अभियंता<br>बांधकाम विभाग, मुख्या. जव्हार,<br>जिल्हा परिषद, पालघर | अति. मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद, पालघर |

**महाराष्ट्र शासन कार्यकारी अभियंता**

**पालघर पाटबंधारे विभाग, मनोर यांचे कार्यालय**

**पत्ता : सूर्या प्रकल्प वसाहत, मनोर, ता. जि. पालघर – ४०१४०३**

**ई–मेल पत्ता : eepidpalghargmail.com / दूरध्वनी क्र. + ९१८००७३३५३७३**

**ई–निविदा सूचना क्र. १० सन २०२३–२४**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर, ता. जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| कामाचे नाव | : | सुर्या उजवा तीर कालवा कि.मी. सा. क्र. २/३५० येथे नविन एस्केप बांधणे. |
| जिल्हा | : | पालघर |
| निविदेची किंमत | : | रु.६७,१४,०३०/– |
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | : | दिनांक : ०१/०२/२०२४ (सकाळी ११.३० वा.) ते<br>दिनांक : १५/०२/२०२४ (सायंकाळी ०४.४५ वा.) |
| Geo- Tagging कालावधी | : | दिनांक : ०९/०२/२०२४ (सकाळी ११.३० वा.) ते<br>दिनांक : ११/०२/२०२४ (सायंकाळी ०४.४५ वा.) |
| ई–निविदा उघडणे | : | दिनांक : १६/०२/२०२४ (संध्याकाळी ०५.०० वा.) (शक्य झाल्यास) |

जा.क्र.पापावि/ लेशा–३/२५६/सन २०२४, दि. २५/०१/२०२४
कार्यकारी अभियंता, पालघर पाटबंधारे विभाग, मनोर ता.जि.पालघर
यांचे कार्यालय

**सही/–**
**(यो. बा. पोटील)**
**कार्यकारी अभियंता,**
**पालघर पाटबंधारे विभाग, मनोर**

**विमाका/कोवि/२०२३ – २०२४/३२८**

# सत्तेची मस्ती महायुतीत कुस्ती!

भाजपच्या शिस्तीला बदनाम करी
बाहेरून आलेल्या लोकांचा तंटा!
भटजी बुवांना झाली डोकेदुखी
आता हलवित बसा पश्चातपाची घंटा !!

संघाच्या शिस्तीत वाढलेला भारतीय जनता पक्ष खरोखरच एक शिस्तप्रिय पक्ष होता. या शिस्तप्रिय पक्षाला आडवाणी वाजपेयी सारख्या महापुरुषांनी, भारतात नावारूपाला आणले. प्रचंड कष्ट करून सत्तेपर्यंत पोचवले. पण त्याच भारतीय जनता पार्टीची आज काही सत्ता लोभी लोकांनी, अक्षरशा दुर्दशा करून टाकलेली आहे. भाजपा मधे जे प्रामाणिक होते, जे निष्ठावान होते, जे शिस्तप्रिय होते, ज्यांना समाजाच्या वेदनांची जाणीव होती, असे लोक आज एकाकी पडलेले आहेत. आणि बाहेरून आलेले बदनाम लोक आज भाजपात मोठ मोठ्या पदांपर्यंत पोहोचलेले आहेत. या लोकांनी भाजपाची अक्षरशः प्रतिमा मलीन केली आहे. मोदी आणि त्यांचे सरकार किती जरी चांगले काम करीत असले, तरी महाराष्ट्रात बाहेरून आलेल्या लोकांमुळे भाजपाची काहीही इज्ञत राहिलेली नाही. त्यातच तपास यंत्रणांचा दुरुपयोग करून भाजपाने लोकांच्या मनात एक संतापाची निर्माण केलेली आहे. आज भाजप बरोबर जे लोक सत्तेत आहेत ते उघडपणे एखाद्या अधिकाऱ्याचा थोबाड फोडायला मागेपुढे बघत नाहीत. कोणालाही शिवीगाळ करायला मागे पुढे बघत नाहीत. पोलिसांवर दबाव आणून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पाठीशी घालत आहेत. आणि आता तर बाहेरून आलेल्या लोकांची पोलीस ठाण्यात गोळीबार करण्यापर्यंत मजल गेलेली आहे. या सगळ्यात सरकार तर बदनाम झालेलेच आहे. पण त्याहीपेक्षा जास्त बदनामी झाली आहे ती शिस्तप्रिय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारतीय जनता पार्टीची! शुक्रवारी रात्री उल्हासनगर पोलीस ठाण्यात जी घटना घडली ती अत्यंत निंदनीय होती. एक गुंड प्रवृत्तीचा आमदार जो सध्या भाजपात आहे, तो पोलीस ठाण्यात जाऊन आपल्या प्रतिस्पर्ध्यावर गोळीबार करतो याचा अर्थ काय? आपण सत्तेत आहोत याचा इतका त्यांना माज चढलाय? वास्तविक आज जर दुसऱ्या कुठल्या पक्षाचे सरकार असते, तर आज गृहमंत्री पदावर बसलेल्या फडणवीस साहेबांनी तात्काळ सरकारवर टीकेच्या आसूड ओढले असते. आणि जो कोणी गृहमंत्री असेल त्याच्या राजीनाम्याची मागणी केली असती. आज स्वतः फडणवीस गृहमंत्री आहेत. आणि त्यांच्या पक्षाच्या एका आमदाराने पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार केलेला आहे. याची जबाबदारी घेऊन गृहमंत्री म्हणून फडणवीस यांनी राजीनामा द्यायला हवा, अशी महाराष्ट्रातल्या तमाम जनतेची मागणी आहे. प्रत्येक वेळी नैतिकतेबद्दल बोलायचं, आणि आज नैतिकता दाखवण्याची वेळ आली तेव्हा लपून बसायचं. भाजपात असे कधीच घडले नव्हते. कदाचित फडणवीस भाजपाची शिस्त विसरले असावेत. आज बाहेरून आलेल्या लोकांविषयी जनमानसात काय बोलले जाते. ते एकदा भाजपच्या नेत्यांनी लोकांमध्ये फिरून एकावे. ज्या गणपत गायकवाड ने पोलीस ठाण्यात घुसून गोळीबार केला. त्याचा एकदा हिस्टरी तपासून बघावा. तो अपक्ष आमदार म्हणून तिकडून निवडून आलेलाआहे. त्याला भाजपामध्ये घेण्याची काय गरज होती? अशा लोकांना भाजपात घेऊन भाजपावर ज्यांनी बदनामीची पाळी आणली आहे, त्याना येत्या निवडणुकीत लोक धडा शिकवतील. पण संघाच्या शिस्तीत वाढलेल एक ध्येयवादी पक्ष अशा पद्धतीने बदनाम होताना बघणे, अत्यंत क्लेशदायी आहे. याची फार मोठी किंमत भाजपाला मोजावी लागणार आहे. भारतीय जनता पक्षाने स्वबळावर विधानसभा निवडणुकीत १०५ जागा जिंकल्या होत्या. याचा अर्थ महाराष्ट्रात भाजपाची बऱ्यापैकी ताकद होती. आणि आज ना उद्या भाजपा स्वबळावर सत्तेत येऊ शकला असता. असे असताना दुसऱ्या पक्षातील बदनाम लोकांना, केवळ सत्तेसाठी भाजपात घेऊन काय मिळवले? सत्ता कधीही मिळू शकते. पण पक्षावर लागलेला बदनामीचा डाग, आणि जनमानसात पक्षाने गमावलेली विश्वासार्हता, कधीही परत मिळू शकत नाही. ज्या लोकांच्या विरोधात भाजपातील लोकांनीच बेहिशोबी मालमत्तेच्या तक्रारी केल्या होत्या. अशा लोकांची ईडी चौकशी होऊन, ते ब्लॅक लिस्टमध्ये गेलेले असताना, त्यांना भाजपात घेतले जाते किंवा भाजपा सोबत सरकार मधे घेतले जाते. आणि ज्याने तक्रारी केल्या होत्या तो मूग गिळून गप्प आहे. हा सगळा प्रकार लोकांना कळतोय. म्हणून तर लोक म्हणत आहेत की भाजपाच्या वॉशिंग मशीन मध्ये धुवून भ्रष्टाचारी बाहेर निघालेत. खरोखरच भाजपा वॉशिंग मशीन आहे का? आणि नसेल तर दुसऱ्या पक्षातील भ्रष्टाचारी लोकांना भाजपाने आपल्या पक्षात का घेतले? कारण हेच लोक आज भाजपासाठी फार मोठी डोकेदुखी ठरलेली आहे. गणपत गायकवाड हा भाजपचा माणूस नव्हता. कल्याण परिसरातील एक क्रिमिनल म्हणून ओळखला जात होता. अशा माणसाला भाजपाने आपल्या पक्षात घेऊन त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीला अप्रत्यक्षरीत्या अभय दिले. कारण आजकाल जे क्रिमिनल लोक आहेत ते सत्ताधारी पक्षाच्या आश्रयाला जाऊन आपल्या गुन्ह्यांवर पांघरून घालण्याचा, किंवा गुन्हेगारीला अभय मिळवण्याचा प्रयत्न करतात. अशा पैकीच एक आहे गणपत गायकवाड! आज तो सत्ताधारी पक्षात असल्यामुळे त्याची पोलीस ठाण्यात जाऊन गोळीबार करण्यापर्यंत मजल गेली. तो भाजपचा आमदार असल्यामुळे लोक गणपत गायकवाड या व्यक्तीला काही बोलणार नाहीत .कारण गुन्हेगारी हा त्याचा पेशा आहे. असे तिथले लोक सांगतात. पण भारतीय जनता पक्षाची इज्ञत गेली त्याचं काय? काही दिवसांपूर्वी पुण्यातला कुख्यात गुंड शरद मोहोळ याची त्याच्या साथीदारीने हत्या केली होती. परंतु या हत्यानंतर भाजपाच्या एका आमदाराने शरद मोहोळ याचे उदातीकरण करण्याचा प्रयत्न केला. शरद मोहोळला शरद मोहोळजी असे संबोधून तो फार मोठा हिंदुत्ववादी होता, आणि हिंदुत्वाच्या रक्षणासाठी त्यांनी बलिदान दिले. असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. भाजप नेतृत्वाला हे मान्य आहे का? शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन पक्ष भाजपाने फोडले. असे आज बोलले जात आहे. आणि ते काही प्रमाणात खरे आहे. दुसऱ्याचे पक्ष फोडून फुटीरांच्या जीवावर सरकार बनवणे आणि टिकवणे किती भयंकर असते हे आज सत्तेतल्या भाजपा नेत्यांना पावलोपावली दिसून येत आहे. या सरकारमध्ये असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर शिखर बँक घोटाळ्याचा आरोप आहे. त्याचबरोबर ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप आहे. आज अन्न व नागरी नागरी पुरवठा मंत्री असलेले छगन भुजबळ हे तर भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली दोन वर्ष तुरुंगात राहून आले आहेत. हसन मुश्रीफ यांची सुविधा चौकशी झाली आहे. अर्जुनराव खोतकर भावना गवळी हे ईडीच्या रडारवर आहेत. त्यांची ही चौकशी झालेली आहे. मग अशा लोकांना सरकार सोबत घेऊन भारतीय जनता पक्षाची प्रतिमा उजळ झाली की मलीन झाली हे एकदा भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर कराव. पंतप्रधान मोदी ने म्हणे भ्रष्टाचार विरोधी मोहीम हाती घेतलेली आहे. गेल्या वर्षी भोपाळमध्ये भाजपाच्या मेळाव्यात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रवादीच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख केला होता. आणि आपल्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादीचा भ्रष्टाचार शोभून कडण्याचे आदेश दिले होते. त्याच्या दुसऱ्याच दिवशी अजित पवार यांनी सरकारसोबत जाण्याचा निर्णय घेतला. याचा अर्थ काय? ज्या राष्ट्रवादीच्या घोटाळ्यांबाबत पंतप्रधान मोदी बोलतात त्याच राष्ट्रवादीतल्या, भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप असलेला एक नेता सरकारसोबत येतो, सत्तेत भाजपच्या मांडीला मांडी लावून बसतो आणि उपमुख्यमंत्री होतो. या घटनेनंतर मोदींच्या भ्रष्टाचार विरोधी मोहिमेवर कोण विश्वास ठेवेल का? भाजप आणि केवळ सत्तेसाठी बाहेरून आलेल्या बदनाम लोकांच्या भरोशावर सरकार चालवणे. भाजपातील प्रामाणिक आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांना अजूनही पटलेले नाही. परंतु ते भाजपात तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करीत करीत आहेत .पण आज ना उद्या त्यांच्या भावनांचा उद्रेक होईल. आणि ज्या दिवशी तसे घडेल त्या दिवशी बदनाम लोकांना भाजपात आणून, त्यांच्या जीवावर सरकार चालवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची काय अवस्था होईल ते महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनता बघेल. आज महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे पण महायुतीतील छोट्या छोट्या पक्षांना जमेत धरले जात नाही. त्याच्या तीव्र प्रतिक्रिया बच्चू कडूंच्या तोंडून उमटत आहेत. एकीकडे भाजपा म्हणते आम्ही ४५ जागा लढवणार आणि जिंकणार. पण त्यांनी जर ४५ जागा लढवल्या तर त्यांच्यासोबत महायुतीत असलेल्या लोकांनी काय करायचे भाजप वाल्यांचे कपडे सांभाळायचे? महायुती मधील राष्ट्रीय समाज पक्षाने तर स्वतंत्र उमेदवार उभे करण्याची घोषणा केली आहे. सदाभाऊ खोत हे सुद्धा वेगळ्या निर्णय घेण्याची शक्यता आहे तर पडळकर भुजबळांसोबत ओबीसींच्या लढ्यात आहेत. तर आत्तापासूनच एकमेकांच्या मतदारसंघांवर दावे केले जात आहेत. शिंदेंच्या चिरंजीव या जीवांचा कल्याण मतदार संघ हा महायुतीत संघर्षाचा केंद्रबिंदू ठरू शकतो. आणि आज कल्याण मध्ये हे काय चाललेले आहे ते पाहता भविष्यात महायुतीमध्ये मोठा राडा होण्याची शक्यता आहे. इंडिया आघाडीत संघर्षाच्या ठिणग्या उडत असताना, महायुती मधील कुस्तीसाठी सत्ताधारी मल्लांनी सुधा दंड थोपटले आहेत.

# देशाच्या अर्थसंकल्पीय पावसात लातूर जिल्हा कोरडाच!

सरत्या पंचवार्षिक अर्थसंकल्पात केंद्र सरकारच्या विविध योजनांचा वारे माप पाऊस पडला असला तरी लातूर जिल्ह्याच्या बाबतीत कुठलाही ठोस अर्थसंकल्पात निर्णय न झाल्याने अर्थसंकल्पीय घोषणाच्या पावसात लातूर जिल्हा कोरडा राहिला आहे. विशेष बाब म्हणजे रेल्वे बजेटच्या बाबतीत विविध ठिकाणच्या योजना जाहीर झाल्या असल्या तरी लातूर जिल्ह्याच्या बाबतीत मात्र केंद्र सरकारची उदासीनता दिसून येत आहे. याबाबत गल्ली ते दिल्ली भाजपची सत्ता असताना लातूरचे खासदार सुधाकर श्रृंगारे हे मूग गिळून गप्प का असा सवाल लातूर जिल्ह्यातील मतदार करीत आहेत, केवळ विविध योजनांच्या घोषणाचा पाऊस पडला असला तरी सारासार हा अर्थसंकल्प आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मांडल्याचे जाणकार बोलत आहेत, इतकेच नव्हे तर लातूर जिल्ह्यातील निलंगा विधानसभा मतदारसंघात या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील एकही योजना या मतदारसंघात लागू पडणार नसल्याचे दिसून येते, सीमावरती भागातील देवणी तालुका हा याचा बळी पडला आहे. केंद्र सरकारच्या विविध योजना जिल्ह्यातील काही मतदारसंघात राबवल्या जात असल्या तरी निलंगा विधानसभा मतदारसंघात अद्याप कुठल्याही योजनेमार्फत कोणतीही विकास कामे होत नसल्याचे दिसून येते हे केवळ मतदार संघाचे लोकप्रतिनिधी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या उदासीन नियोजनामुळे होत आहे यात भर म्हणून आगामी निवडणूक लोकसभेची असली तरी विधानसभेच्या तयारीला लागलेले हे लोकप्रतिनिधी आपापल्या मुश्किल पणात वावरताना दिसत आहेत केवळ सोशल मीडियाच्या माध्यमातून विकासाचा पाऊस पाडून चालणार नाही तर ग्राउंड लेवलवर विकास होताना दाखवला गेला जात नाही, अद्याप पर्यंत केंद्र सरकारच्या विविध योजनांचा रथ देशभर मोदी सरकारची हमी म्हणून मिरवत असला तरी या मतदारसंघात या रथाचा सारथी कोण हा प्रश्न सर्वसामान्यातून विचारला जात आहे. लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुधाकर श्रृंगारे हे लातूर लोकसभा मतदारसंघातील चार दोन मतदारसंघ सोडले तर अद्याप पर्यंत कुठल्याही मतदारसंघात वावरल्याचे दिसून येत नाही केवळ मोदी नावावर लहर चालेल या अपेक्षेपोटी असलेल्या लातूरचे खासदार श्रृंगारे यांना या निवडणुकीत फटका सहन करावा लागणार आहे !गटातटाच्या राजकीय खेळीत विकासाचे तीन तेरा झाले आहेत यात मराठा आरक्षण अथवा ओबीसी आरक्षण असेल हा सरतावर्ष आरक्षणाच्या नावावर लोकप्रतिनिधीचा शिमगा झालेला आहे या शिमग्यात विरोधकांनी चांगलाच हात धुवून घेतल्याचे दिसून येते, लोकप्रतिनिधी ची उदासीनता



ही आता लपून राहिलेली नाही देवनी येथील ऐतिहासिक देवणी जातीच्या वळूचे संशोधन केंद्र हे बीड जिल्ह्याला गेल्यामुळे सत्तेतील हे लोकप्रतिनिधी बैल झाले की काय अशी तिखट प्रतिक्रिया काँग्रेस सेवा दलाचे निलंगा विधानसभा अध्यक्ष बालाजी वळसांगवीकर यांनी 'क्राईम संध्या'शी बोलताना दिली. लातूर जिल्ह्यातील मांजरा पट्टा सोडला तर पाणीटंचाईच्या तीव्र झळा या गावोगावी बसताना दिसत आहेत, काही महिन्यापूर्वीच लातूर लोकसभेचे खासदार सुधाकर श्रृंगारे व निलंगा विधानसभेचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी जलदूत म्हणून संपूर्ण जिल्हाभर आंदोलन केले पण या आंदोलनाचे गल्ली ते दिल्ली सत्ता असताना फलित काय असा प्रश्न निर्माण झाला आहे देवणी हे नगरपंचायतीचे ठिकाण असताना या ठिकाणी पाणीपुरवठ्याची कायमस्वरूपी योजना राबवली गेली जात नाही हे शोकांतिका आहे तर निलंगा नगरपरिषद या ठिकाणी अद्यापपर्यंत अनेक वेळा लाईट बीलाच्या तगाद्याने पाणीपुरवठ्याचे वीज कलेक्शन तोडले जात असल्याने नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त करताना दिसून येत आहे. मोठ्या शहराला कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याच्या योजना साठी कुठलेही ठोस पाऊल उचलण्यात हे सत्तेतील लोकप्रतिनिधी सपशेल अपयशी ठरलेले दिसून येतात निव्वळ टक्केवारीच्या लालसेतून तालुका मतदारसंघाच्याबाहेर आनेक असलेले प्रशासकीय कार्यालय मात्र पळवा पळवीचा सपाटा चालू आहे यात गेल्या अनेक वर्षापासून सर्वसामान्याला अडचणीची ठरत असलेले महसूल विभाग कार्यालय पोलीस उपाधीक्षक कार्यालय व आत्ता वीज महावितरणाचे उपविभागीय कार्यालय हे निलंगा या मुख्यालय नेऊन ठेवण्याचा घाट घातला जात आहे, यात सर्वसामान्य नागरिकाला किरकोळ कामासाठी दिवसेंदिवस हेलपाटे निलंगा या ठिकाणी मारावे लागत आहेत अनेक तालुके निर्माण ९करताना शासनाचे धोरण म्हणून सर्वसामान्यांची सोय पाहिली जाते पण लोकप्रतिनिंकडून या योजनेचा आपल्यासाठी सोय कशी होईल या दृष्टिकोनातून संबंधित कार्यालय मुख्यालय नेण्याचा हा केविलवाना प्रयत्न केला गेला आहे यांना येणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत धूळ चारेल अशी ही सौकीयाकडून बोलले जात आहे.

– शकील मनियार

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रजासत्ताक दिनाचे महानायक!

आज आपण ७४वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहाने साजरा करीत आहोत. घटनेच्या अंमलबजावणीला आज ७४ वर्षे पूर्ण झाली असून पुढील वर्षी आपण प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव साजरा करणार आहोत. २६ डिसेंबर १९४९ रोजी घटना समितीने आपल्या राज्यघटनेला स्वीकृती दिली आणि २६ जानेवारी १९५० पासून देशांमध्ये घटनेचा अंमल सुरू झाला. भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले. त्यापूर्वी भारतीय एक संघ म्हणून राष्ट्र नव्हते ते वेगवेगळ्या गटांमध्ये विभागलेले होते शिवाय इथे अनेक संस्थानिक राजे होते पण घटनेच्या अंमलबजावणी पासून भारत एक संघराज्य म्हणून उदयास आले. २६ जानेवारी १९५० ला जेव्हा आपण संसदीय लोकशाही शासन पद्धती स्वीकारली तेव्हा ते लोकशाहीचे इवलेसेरोपटे लावले गेलेले होते पण आज त्याचा वटवृक्ष होऊन जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून जग भारताकडे पाहले जाते. घटनेच्या अंमलबजावणीनंतर सर्व प्रजेची सत्ता असणारा प्रजासत्ताक हा साजरा करीत असताना संविधानाचे निर्माते शिल्पकार म्हणून महानायक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव झालाच पाहिजे या ७४ वर्षाच्या काळात भारताने सर्वच क्षेत्रात अतुल्य नियकामगिरी केली आहे. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी आपल्या देशात टाचणीचेही उत्पादन होत नव्हते त्या देशात विमान,जहाज यासारख्या अवजड वस्तूंचे उत्पादन करण्यात येत आहे. औद्योगीकरणामुळे देश आज विविध वस्तूंचे उत्पादन करीत आहे विज्ञानवादी दृष्टिकोनामुळे आज देशाने चांद्रयानमोहीम मंगळ मोहिमेद्वारे आकाशाला गवसणी घातली आहे सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. मग ते शेती क्षेत्राआसो सामाजिक क्षेत्र आसो राजकीय किंवा सांस्कृतिक क्षेत्र असेल ज्या शेती क्षेत्रावर देशातील लोकसंख्या अवलंबून आहे त्या शेती क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे एक काळ असा होता की आपल्या लोकसंख्येला अन्नधान्याचा तुटवडा पडतो म्हणून दुसऱ्या देशाकडून अन्नधान्याची आयात केली जात होती ती आयात आता पूर्णपणे थांबलेली असून भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे भारत आता शेती क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या वस्तूंची निर्यात करतो शेती उत्पादन वाढवण्यासाठी शेतीला पाणीपुरवठा व्हावा म्हणून सिंचनाची सोय केली अनेक धरणाची निर्मिती करण्यात आली शेतीचे उत्पादन वाढावे म्हणून कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आले शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय प्रगती झाली आहे १९५१ सालात साक्षरतेचे प्रमाण अवघे १८.३३% होते त्या मध्ये पुढील काळात कितीतरी पटीने वाढ झालेली आहे महाराष्ट्र सारख्या राज्यातही प्रमाण ८५% पर्यंत पोहोचले आहे पण अजूनही उत्तरेकडील राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण कमी दिसते यामध्ये राजस्थान बिहार उत्तर प्रदेश हे राज्य येतात त्याचप्रमाणे सामाजिक राजकीय व सांस्कृतिक क्षेत्राची वाढ झालेली आहे ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे. दीडशे वर्षाच्या इंग्रजांच्या जुलमी राजवटीतून १५ ऑगस्ट १९४७ ला आपला देश स्वतंत्र झाला हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी हुतात्मे पत्करले अनेकाने बलिदान दिले इंग्रजांच्या राजवटी विरोधात प्रदीर्घ लढा दिला महात्मा गांधींचे व त्या काळातील पुढाऱ्यांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान महत्त्वाचे आहे स्वातंत्र्य दिन साजरा करताना महात्मा गांधीजींची प्रतिमा ठेवण्यात येते तसेच हा दिन साजरा करताना स्वातंत्र्य सैनिकांचा गौरव केला जातो त्याचप्रमाणे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन साजरा करताना या दिवशी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा संविधान निर्मितीचा गौरव झालाच पाहिजे पण आपल्याकडे हे दोन्ही दिवस साजरे करीत असताना या दोन दिवसातील फरक समजून घेतला जात नाही हे दोन्ही दिवस एक राष्ट्रीय उत्सव म्हणून साजरे केले जात असले तरी २६ जानेवारीच्या दिवसाचे वेगळे महत्त्व आहे या दिवशी आपल्या देशामध्ये घटनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे या दिवशी भाषणांमधून घटना तयार करण्याची पार्श्वभूमी सांगणे अभिप्रेत आहे घटना समितीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे घटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्षपदी निवड केली त्यांनी अहोरात्र झिजून घटना निर्माण केली म्हणजे संविधान निर्मात्याचे योगदान मांडणे आवश्यक आहे राज्यघटनेतील मूलभूत अधिकार किती महत्त्वाचे आहेत हे नागरिकांना माहीत होणे आवश्यक आहे सर्वांना विकासाची समान संधी सर्वांना सत्तेत सहभाग भारतीय राज्यघटनेने जो प्रौढ मतदानाचा हक्क बहाल केलेला आहे त्याचे स्वरूप मूलभूत अधिकारांसारखेच आहे त्याची जाणीव करून देणे आवश्यक आहे एक व्यक्ती एक मत हे तत्व मान्य करून सर्वांना शासनात सहभागी होण्याची समान संधी देऊन राजकीय लोकशाही संवर्धित करण्याचा प्रयत्न घटनाकारांनी केला आहे प्रत्येक व्यक्तीच्या मताचे मूल्य समान आहे म्हणजे कोणत्याही प्रकारच्या भेदावर गरीब श्रीमंत किंवा जातीवर आधारित मताचा अधिकार नाही. मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांनी या राज्यघटनेत समतावादी मानवतावादी बंधुत्ववादी कलमे समाविष्ट केली अशी कलमे घटना समितीत मांडणे त्यावर साधक बादक चर्चा घडवून आणणे सदस्यांच्या शंकाचे समर्पक अभ्यासपूर्ण उत्तर देणे आणि सर्व संमतीने ते मंजूर करून घेणे हे महनिय कार्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कुशलतेने केले त्यांच्या या अमूल्य योगदानामुळे त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार म्हटले जाते आज देशाचे प्रधानमंत्री स्वतःला चहा विकणारेसांगतात अशांना प्रधानमंत्री पदाची संधी मिळाली ती घटनेमुळेच किंवा देशाच्या राष्ट्रपतीपदाचा मान या आदिवासी महिलेला मिळाला आहे तो घटनेमुळेच राज्यघटनेतील हे बदल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या दूर दृष्टीमुळेच ना म्हणूनच प्रजासत्ताक दिनाचे ते खरे महानायक ठरतात म्हणूनच सर्व शैक्षणिक संस्था मधून शाळा महाविद्यालय विद्यापीठामधून सरकारी निम सरकारी कार्यालयामधून ध्वजारोहण प्रसंगी भारतीय राज्यघटनेची प्रत आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा ठेवून सन्मानित करण्यात यावे घटना अमलात आल्यापासून गेल्या ७४ वर्षात अजूनही नागरिकांमध्ये आपल्या राज्यघटने विषयी जागरूकता नाही हे खरे आहे सर्वसामान्य नागरिकांना राज्यघटनेशी आपला काय संबंध असा प्रश्न पडतो काही जण पुढे जाऊन राज्यघटनेचा आपल्याला काय उपयोग असे देखील पोरकटपणाची भाषा वापरतात नागरिकांमध्ये जेवढ्या प्रमाणात घटनेविषयी जागरूकता होणे आवश्यक आहे तेवढे होताना दिसत नाही तरी अलीकडच्या काळात घटनेतील उद्देशिकेचे जाहीर वाचन होताना दिसते आपले दररोजचे जे जगणे आहे ते सुद्धा राज्यघटनेमुळेच हे लक्षात घेणे आवश्यक आहे भारतीय राज्यघटनेमध्ये जे तिसरे प्रकरण आहे ते अत्यंत महत्त्वपूर्ण आहे त्यामध्ये नागरिकांचे मूलभूत अधिकार दिलेले आहेत किमान त्याची माहिती नागरिकास असणे आवश्यक आहे कलम १४ मध्ये समानतेचा अधिकार दिला आहे म्हणजे कायद्यासमोर सर्व समान कलम १५ नुसार कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्यास मनाई तर कलम सोहळा अनुसार सार्वजनिक पदावरील नेमणूक व सेवा योजना याबाबत सर्व नागरिकांना समान संधी मागासवर्गीय ना सार्वजनिक सेवांमध्ये योग्य प्रमाणात प्रतिनिधित्व मिळाले नसल्यास त्यांच्यासाठी नियुक्ती करता किंवा पदे राखून ठेवता येतील कलम १७ नुसार अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरूपातील आचरण नि षिद्ध करण्यात आले आहे अस्पृश्यता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल कलम १८ प्रमाणे पदव्यांना बंदी म्हणजे सेवाविषयक विद्याविषयक मान विशेषसोडून इतर कोणताही किताब राज्य देणार नाही परकीय देशाकडून कुणालाही कोणताही किताब स्वीकारता येणार नाही कलम १९ नुसार स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला आहे ज्यामध्ये भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा अधिसंघ व संघ बनवण्याचा भारतात सर्वत्र व मुक्तपणे संचार करण्याचा भारतात कोठेही राहणे आणि स्थायिक होण्याचा कोणताही व्यवसाय धंदा किंवा उदीम करण्याचा अधिकार आहे कलम २० अंतर्गत अमलात असलेल्या कायद्याचा भंग केला तरच व्यक्तीला दोषी ठरवता येईल तो अपराध करतेवेळी अस्तित्वात असलेल्या कायद्याने सुचविली असेल तेवढीच शिक्षा दोषीला करता येईल एका अपराधा बद्दल एकदाच खटला भरता येईल व एकदा शिक्षा देता येईल कलम २१ प्रमाणे कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली पद्धती अनुसरल्याशिवाय कोणाचेही जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावून घेता येणार नाही तर अलीकडे कलम २१ अ अनुसार सहा ते १४ वर्षे वयाच्या बालकांना राज्य मोफत व सक्तीचे शिक्षण देईल ८६वी घटनादुरुस्ती २००२ वरील प्रमाणे सहा प्रकारच्या अधिकाराचा मूलभूत अधिकारातसमावेश होतो १९७८च्या घटनादुरुस्तीने मालमत्तेचा असणारा मूलभूत अधिकार जो होता त्याचा समावेश सर्वसामान्य अधिकारात केला आहे ज्याप्रमाणे नागरिकाला घटनेने मूलभूत अधिकार बहा ल केलेले आहेत त्याचप्रमाणे भाग चार क मध्ये कलम ५१ क अंतर्गत मूलभूत कर्तव्याचे पालन करण्यासही सांगितले आहे. शेवटी आजच्या प्रजासत्ताक दिनी प्रजासत्ताकाच्या महानायकाला सन्मान देऊन संविधान रक्षणाची प्रतिज्ञा घेणे हाच खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक दिन साजरा करण्याचा सार्थक दिन ठरेल.

– प्राचार्य शंकर सोनवणे, लातूर

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई–६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०–२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा–वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## वलांडी येथील अल्पवयीन मुलीवर अनैसर्गिक अत्याचार

# सर्वपक्षीयांचा देवणी बाजारपेठ बंद ठेऊन निषेध मोर्चा





**देवणी/प्रतिनिधी**

सहा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर १५ ते १९ जानेवारी रोजी सायंकाळी पाच ते सहाच्या सुमारास स्वतः च्या घरात बोलाऊन पिडीतेवर सतत पाच दिवस अनैसर्गिक अत्याचार करणाऱ्या आरोपी विरोधात पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्याद वरून बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोकसो) व अनुसुचित जाती जमाती आत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत २५ जानेवारी रोजी रात्री देवणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने पाच दिवसाची पोलीस कस्टडी सुनावली आहे. पुढील तपास निलंगा उपविभागीय पोलिस अधिकारी नितीन काटेकार हे करीत आहेत.

देवणी तालुक्यातील वलांडी येथील अल्ताफ महेबुब खुरेशी या नराधमाने, सहा वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक आत्यचार केल्याच्या निषेधार्थ देवणी शहरात दिनांक १ फेब्रुवारी गुरुवार रोजी सकाळी दहा वाजता व्यापारी संघटना व सर्वपक्षिय, तसेच विविध संघटनेच्या वतीने एक दिवस बाजारपेठ कडकडीत बंद ठेऊन निषेध मोर्चा काढण्यात आलाया मोर्चात शालेय विद्यार्थ्यांनी हातात निषेधाचे फलक घेऊन मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला होता. हा मोर्चा राम मंदिरा पासून ते मुर्गी चौक मार्गे बस्थानकासमोरून बोरोळ चौकापर्यंत काढण्यात आला. यावेळी मोर्चेकऱ्यांनी देवणी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार राहुल पत्रिके व मंडळ अधिकारी अनिता ढगे यांना निवेदन दिले, दिलेल्या निवेदनात म्हणले आहे की आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी, खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा, पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यात यावे यासह अनेक मागण्या केल्या आहेत. यावेळी अनुचित प्रकार घडू नये म्हणून देवणी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# नालासोपाऱ्यात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या पाच ते सहा मालवाहतूक वाहने जळून खाक!

**नालासोपारा/प्रतिनिधी**



नालासोपारा येथे पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांना भीषण आग लागल्याची घटना नालासोपारा येथे घडली आहे. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झालेली नसली तरी या आगीत सात मालवाहू ट्रक पूर्णपणे जळून खाक झाले आहेत. नालासोपारा पूर्वेकडील धानिवबाग परिसरात पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका मालवाहू ट्रकने अचानक पेट घेतला. त्यानंतर या ट्रकला लागलेल्या आगीने अचानक रौद्ररूप धारण केले व पार्किंगमध्ये शेजारी उभ्या असलेल्या इतर ट्रक आगीच्या भक्षस्थानी आले. पाहता पाहता सर्वत्र आगीचा भडका उडाला व आगीचे लोण सर्वत्र पसरले. आग लागल्यानंतर स्फोट झाल्यामुळे एक ते दीड किलोमीटर परिसरातील काही घरांच्या काचा फुटल्याचे कळते. भीषण आगीमुळे परिसरातील नागरिक देखील भयभीत होऊन घराबाहेर पडले. रात्री एक वाजताच्या सुमारास ही घटना घडली. त्यानंतर स्थानिक नगरसेवक पंकज पाटील यांनी या घटनेची माहिती अग्निशमन देत अग्निशमन दलाला पाचारण केले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. वसई-विरार महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल एक तास अथक परिश्रम घेत आगीच्या भक्षस्थानी आलेल्या या वाहनांना लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवले. सुदैवाने पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ट्रकना लागलेल्या या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र या आगीत सात मालवाहू ट्रक पूर्णपणे जळून खाक झाले असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पार्कींगमध्ये उभ्या असलेल्या ट्रकमध्ये एखादा केमिकलचा ट्रक असावा त्यामुळेच इतकी भीषण आग लागली असावी प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र अचानक वाहनांना लागलेल्या या आगीचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# कॅरम स्पर्धेत दुर्गेश्वरी धोंगडे महाराष्ट्रातून चॅम्पियन



**जळगाव/प्रतिनिधी**

मुंबई-दादर येथे ५७वी सब ज्युनिअर महाराष्ट्र कॅरम स्टेट चॅम्पियनशिप स्पर्धा पार पडली. २८ ते २९ जानेवारी दरम्यान झालेल्या या स्पर्धेत जळगावची दुर्गेश्वरी योगेश धोंगडे महाराष्ट्रातून चॅम्पियन ठरली. अधोरेखित करण्यासारखी बाब म्हणजे दुर्गेश्वरीने सलग दुसऱ्यांदा महाराष्ट्रातून चॅम्पियन ठरली आहे. या यशामुळे दि. २८ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान वाराणसी येथे होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी तिची निवड झाली. जैन स्पोर्टस् ॲकॅडमीची खेळाडू असलेल्या दुर्गेश्वरीचा महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सेक्रेटरी अरूण केदार, सहसचिव यतिन ठाकूर, चिफ रेफ्री केतन चिखले यांच्याहस्ते चषक, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जळगावची दुर्गेश्वरी धोंगडे हिने सेमी फायनलमध्ये सिंधुदुर्गची दिव्या राणे हिचा सरळ दोन सेटमध्ये पराभव केला. त्यानंतर अंतिम सामना तीन लढतीत रत्नागिरीच्या निदा मनोज सप्रे हिच्यासोबत झाला.

पहिला सेट दुर्गेश्वरीने जिंकून आघाडी घेतली त्यानंतर निदा सप्रे हिने दुसरा सेट जिंकून बरोबरी साधली मात्र रोमांचकारी झालेल्या अंतिम सेटमध्ये दुर्गेश्वरी धोंगडे हिने विजय मिळवून महाराष्ट्र कॅरम चषकावर आपले नाव कोरले. प्रशिक्षक म्हणून योगेश धोंगडे यांनी काम पाहिले. तिच्या यशाबद्दल जैन इरिगेशनचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन, जैन स्पोटर्स ॲकडमीचे अरविंद देशपांडे, सय्यद मोहसीन यांनी कौतूक केले.

# वसईत सोमवारपासून 'विकसित भारत संकल्प' यात्रेचा दुसरा टप्पा

**विरार/प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'विकसित भारत संकल्प' यात्रेचा दुसरा टप्पा येत्या सोमवार पासून सुरू होणार आहे. ५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२४ या काळात वसई विरार शहरातील ९ प्रभागात ही यात्रा फिरणार आहे. नोव्हेंबर महिन्यात वसईत सुरू झालेल्या या यात्रेच्या पहिल्या टप्प्याला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे योजनेचा दुसरा टप्पा आयोजित करण्यात आला आहे. केंद्राच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून त्याचा लाभ मिळवून देण्यासाठी 'विकसित भारत संकल्प यात्रा' या मोहीमेचे आयोजन करण्यात आले आहे. २८ नोव्हेबर ते २२ डिसेंबर २०२३ या कालावधीत या योजनेचा पहिला टप्पा महानगरपालिका क्षेत्रात सुरू झाला होता. पहिल्या टप्प्यात शहराच्या ९ प्रभागातील ४९ शिबिरांमध्ये २० हजारांहून अधिक नागरिक उपस्थित होते. त्यात ९ हजार ३४० पुरूष तर १० हजार ८९३ महिलांचा समावेश होता. तर हजारो नागरिकांनी विविध योजनांचा लाभ घेतला होता. या योजनेला मिळालेल्या भरगोस प्रतिसादामुळे यात्रेचा दुसरा टप्पा आयोजित करण्यात आला आहे. सोमवार ५ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी या काळात ही यात्रा वसई विरार शहराच्या विविध भागात फिरणार आहे. या योजनेत नागरिकांना तात्काळ आधार कार्ड, आयुष्यान भारत कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय महिलांना उज्वला गॅस योजना तसेच फेरीवाल्यांना पंतप्रधान स्वनिधी योजनेअंतर्गत कर्जे उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय आरोग्य शिबिरात विविध मोफत तपासणी केली जाणार असून मोफत औषधे दिली जाणार आहेत. वसई विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेचा पहिला टप्पा आयोजित करण्यात आल्यामुळे नागरिकांची कुठलीच गैरसोय झाली नव्हती. सर्व ठिकाणी परिपूर्ण व्यवस्था करण्यात आली होती. यामुळे हजारो नागरिक शासकीय योजनेचा लाभ घेऊ शकले होते. नागरिकांच्या या प्रचंड प्रतिसादामुळेच केंद्र शासनाच्या निर्देशानुसार दुसरा टप्प्याचे आयोजन वसई विरार शहरात करण्यात आले आहे. यावेळी देखील अशाच पध्दतीने विकसित भारत संकल्प यात्रेचे चांगले नियोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे वसई विरार मधील नागरिकांनी या यात्रेला भेट देऊन शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन या योजनेचे समन्वय अधिकारी आणि उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी केले आहे. यात्रेदरम्यान होणाऱ्यास कार्यक्रम स्थळांची माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

## विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्याची वसईकरांना संधी




# वलांडी येथील पिडीतेच्या कुटूंबास अक्का फाऊंडेशन मदत



**देवणी/प्रतिनिधी**

वलांडी ता. देवणी येथील अत्याचार ग्रस्त पिडीतेच्या कुटूंबाची अर्थीक परिस्थीती दुर्बल असल्याने त्या कुंटूंबास अक्का फाऊंडेशनचे आ संभाजीराव पाटील व युवा नेते अरविंद पाटील निंलगेकर यांच्या सुचनेनूसार शुक्रवार रोजी पिडीत कूंटुबियाना १ लाख २१ हजार रु नगदी स्वरुपात मदत करण्यात आली व तसेच समाजकल्याण विभागाच्या वतीने मदत करण्यात आली असल्याचे रामलिंग शेरे यांनी क्राईम संध्या शी बोलताना सांगितले. सदर पिडीत मुलीच्या कुंटुबियांना मनोधर्य योजनेतुन या कुंटुबियाना दोन लक्ष पन्नास हजार रूपयाचा निधी व पिडीतेच्या आईस समाजकल्याण विभागात दरमहा बारा हजाराची नौकरी ऊपलब्ध करूण देण्यात आल्याची माहीती आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली असल्याचे शेरे यांनी सांगीतले. कुटूंबातील कर्ता व पिडीत मुलीच्या वडीलांचे अकाली निधन झाले असून आजी आजोबा हे वृद्ध असून अर्थीक ऊत्पन्नाचे कोणतेही साथन ऊपलब्ध नाही. यासाठी मुलीच्या आईला स्वायलंबी करण्यासाठी अक्का फांऊडेशनच्या वतीने शिवणकाम करण्यासाठी शिलाई मशिन उपलब्ध करुन देऊ व या कुंटुबियाना रमाई घरकुल योजनेतुन घरकुला सोबतच संगायो योजनेतुन या कुंटुबातील आई व आजी आजोबा व आत्या यांचा पगार मंजूर करण्यासाठी शासनाकडे प्रस्तावह सादर करण्यात आला असल्याची माहीती अक्का फांऊडेशनचे समन्वयक रामलिंग शेरे यांनी दिली. यावेळी डॉ.मल्लीकार्जून शंकद, भाजपाचे माजी तालूका अध्यक्ष चंद्रशेखर महाजन, सुधिर भोसले महीला अधार केंन्द्राच्या कुशावर्ताताई बेळळे, सुशांत साबणे निर्भय पिचारे गणेश चवाळे यांची उपस्थीती होती.

# वसई उपविभागीय अधिकाऱ्यांनी घेतली दखल; दालनाचे नूतनीकरण



**वसई/प्रतिनिधी**

वसई उपविभागीय कार्यालयामध्ये काही दिवसांपूर्वीच उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांचे दालन नूतनीकरण केले, परंतु अभ्यंगतांसाठी या कार्यालयात प्रतिक्षालय किंवा बसण्याची, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नसल्याबाबत वसतील एका दैनिकाने वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची तात्काळ दखल घेत शुक्रवारी अभ्यंगतांसाठी नवीन खुर्च्या मागवण्यात आल्या. वसई उपविभागीय कार्यालयात विविध प्रकारचे दावे खटले, जमीन बाब प्रकरणे सुरू असतात. यासाठी वसई तालुक्यातून अनेक नागरिक या कार्यालयात दररोज दाखल होत असतात. प्रलंबित दाव्यांसाठी अनेक नागरिक या कार्यालयामध्ये आपल्या खटल्याच्या क्रमांकासाठी प्रतीक्षेत असतात परंतु सदर नागरिकांना साधी बसण्याची किंवा प्रतीक्षालयाची ही सोय उपलब्ध नाही. परिणामी या कार्यालयाच्या बाहेर ऊनात किंवा दालना बाहेर तासन तास तिष्ठत उभे रहावे लागते. अश्या अनेक तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे जन सामान्याच्या समस्येची दखल घेत याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केले होते. याबाबत आपण तरतूद केली होती, प्रक्रिया सुरु होती अशी माहिती प्रांत अधिकारी शेखर घाडगे यांनी दिली.

# घरफोड्याच्या गुन्ह्यातील आरोपीला केले जेरबंद




**सोलापूर/प्रतिनिधी**

अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे सिंनूर तालुका अक्कलकोट येथील चोरी घरफोडीच्या गुन्ह्याची उकल अक्कलकोट दक्षिण पोलिसांनी करून आरोपीला ताब्यात घेतले. एक तोळे वजनाचे मणी, मंगळसूत्र एक तोळे वजनाचे, बोरमाळ अर्धा तोळे वजनाच्या, एकूण सहा अंगठ्या, एकूण पाच तोळे सोने असा २ लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. १९ जून २०२३ रोजी रात्री नऊ ते पहाटे पाचच्या दरम्यान मौजे सिंनूर तालुका अक्कलकोट येथील लिंगराज अर्जुन हौदे याचे घरामध्ये कोणीतरी अज्ञात चोट्याने घरात प्रवेश करून घरातील कपाटे उचकटून रोख रक्कम आठ लाख रुपये व सहा लाख आठ हजार चारशे रुपये सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याने अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात यल्लप्पा उर्फ खल्या अद्रक शिंदे (वय ४२) सध्या बेळंकी तालुका मिरज जिल्हा सांगली यास मिरज ग्रामीण पोलिसांना अटक करून त्यांच्याकडून दोन लाख पन्नास हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने त्यात एक तोळे वजनाचे मणी मंगळसूत्र, एक तोळे वजनाची बोरमाळ, अर्धा तोळे वजनाचे एकूण सहा अंगठ्या एकूण पाच तोळे सोने हस्तगत केले आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर व विभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल कोळी, पोलीस हेड कॉन्स्टेबल भोसले, पोलीस नाईक चव्हाण, लामजने, पोलीस नाईक मुल्ला, पोलीस कॉन्स्टेबल जवळगे, पोलीस कॉन्स्टेबल धुमाळ यांनी कामगिरी बजावली आहे.

# वसई-विरार शहरात सदनिका खरेदीत फसवणूक करणाऱ्या भामट्याला अटक

**नालासोपारा/प्रतिनिधी**



वसई-विरार भागात इमारत बांधकामे जोरात होत असून सदनिका स्वस्त देतो असे सांगून घर घेणाऱ्या ग्राहकाला हातोहात फसविणारे कथित इस्टेट एजंट मोठ्या प्रमाणात वाढत असून आठ सदनिका विक्री प्रकरणात फसवणूक करणाऱ्या एका बदमाशाला पोलिसांनी अटक केली आहे. नालासोपारा परिसरात स्वस्त दरात सदनिका उपलब्ध आहेत. अशी जाहिरात करुन सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या सराईत आरोपीला अटक करण्यात विरार गुन्हे शाखा ३ ला यश आले. या आरोपीवर अर्नाळा, तुळींज, नालासोपारा या पोलिस ठाण्यात फसवणुकीचे आठ गुन्हे दाखल आहेत. आत्तापर्यंत ग्राहकांची एकूण दोन कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. रामसिंग जालमसिंग देवरा ऊर्फ राम पाटील असे अटक सराईत आरोपींचे नाव आहे. स्वप्नील हळदणकर, अमोल भोईर, राहुल सिंग ऊर्फ सूरज दुबे, अरविंद दुबे अशी त्याच्या साथीदारांची नावे आहेत. विरार पूर्वेतील ग्लोबल सिटी येथील सनसाईट्स बिल्डिंगमधील सदनिका स्वप्नील हळदणकर याच्या मालकीची असल्याचे भासवून २०२२ मध्ये संतोष ठाकूर यांच्याकडून सात लाख ८३ हजार रुपये घेत ही रुम विकली होती. पण सदनिकेचा ताबा दिला नसल्यामुळे अर्नाळा सागरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल होती. या गुन्ह्याचा तपास करीत असताना विरार गुन्हे शाखा ३ चे प्रभारी पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख यांच्या पथकाने संशयित आरोपीला अटक केली.

# राहूरी वकील दांपत्य हत्येच्या निषेधार्थ भिवंडीत वकिलांचे आंदोलन




**भिवंडी/प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्ह्यातील राहूर येथे राजाराम आढाव,मनिषा आढाव या वकील दांपत्याची खंडणीसाठी हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी व या घटनेचा निषेध करण्यासाठी भिवंडी वकील संघटनेच्या वतीने अध्यक्ष अॅड दिनेश्वर पाटील यांच्या नेतृत्वाखाली भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालयावर निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात शेकडो वकील सहभागी झाले होते.या निषेधार्थ गुरुवारी दुपार पर्यंत भिवंडी न्यायालयातील कामकाज न करण्याचा निर्णय वकिलांनी घेतला होता.तसेच वकील संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी देखील वकील संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना देण्यात आले.

05 TO 11 FEBRUARY 2024 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 2/3/2024 9:48 PM Page 1



# नवनियुक्त पोलीस निरीक्षक यांची पत्रकारांनी घेतली सदिच्छा भेट



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश कदम यांची भिवंडी ग्रामीण येथे बदली झाली असून, भिवंडी ग्रामीणचे पोलीस निरीक्षक रनवीर बायेस यांची वाडा पोलीस ठाणे येथे नियुक्ती झाली आहे. निवडणुकांच्या अनुषंगाने पोलीस अधिकाऱ्यांच्या जिल्हा बदली होत असल्याची माहिति मिळाली आहे. वाडा पोलीस ठाण्याची धुरा आता नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक रनवीर बायेस हे सांभाळणार असून भिवंडी ग्रामीण येथून आलेले ते कार्यकुशल अधिकारी असल्याने वाड्यातील अवैध गुन्ह्यांना ते नक्कीच आळा घालतील असा विश्वास लोकांनी व्यक्त केला आहे. वाडा तालुका पत्रकारांनी सोमवारी (दि.२९ जानेवारी) त्यांची सदिच्छा भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. बायेस यांची राष्ट्रपती पुरस्कारासाठी निवड झाली असल्याने पत्रकारांकडून त्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या तर सर्वसामान्य नागरिकांनी त्यांच्यावर होत असलेल्या अन्याया बाबत थेट माझ्याशी संपर्क साधून आपले गऱ्हाणे मांडावे, त्यांना पूर्ण न्याय देण्याचा माझा प्रयत्न राहील असे मत बायेस यांनी यावेळी व्यक्त केले. या प्रसंगी पत्रकार संजय लांडगे, प्रितेश पटेल, मच्छिन्द्र स्पष्टे, अनिल पाटील, जयेश घोडविंदे आदी उपस्थित होते.

# कल्पना इंगोले यांची राष्ट्रवादीच्या महिला तालुका अध्यक्षपदी नियुक्ती!



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसचा महिला आघाडीच्या विलेपार्ले तालुका अध्यक्षपदी कल्पना इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष समीर भुजबळ यांच्या हस्ते कल्पना इंगोले याना नियुक्तीचे पत्र आणि शुभेच्छा देण्यात आल्या.

## मंडळ अधिकारी व महिला तलाठीस लाच घेताना अटक

वाडा : वाडा तालुक्यातील तलाठी सजा कोने अंतर्गत येणाऱ्या एका तक्रारदाराने सातबारावरील मयत नातेवाईकांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे नोंदवण्यासाठी कोने मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडे खेटे घातले होते. याच कामासाठी दोन्ही लाचखोरानी ३० हजारांची रक्कम मागितली असता याबाबत एसीबीकडे तक्रार करण्यात आली होती. मंगळवारी यशस्वी सापळा रचून यातील दोन्ही आरोपींना रंगेहाथ पकडले असून याबाबत पुढील कारवाई सुरू आहे.

# मासिक पाळीवर बोलू काही मोहिमेला मुलींचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**वाडा/प्रतिनिधी**

उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने महिला शिक्षण व सक्षमीकरण मोहीम योजने अंतर्गत जिल्हा परिषद शाळा डाहे येथील विद्यार्थिनींसाठी चला मासिक पाळीवर बोलू या काही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मासिक पाळीच्या दिवसात घ्यावयाची काळजी, स्वच्छता व सुरक्षितता या बाबत उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या प्रणाली पाटील, महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती रोहिणी शेलार व परळी प्रथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ.शुभांगी सिनरे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास डाहे ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच वृषाली सचिन पाचलकर, शाळेचे मुख्याध्यापक गणेश भिकाजी पाटील, माजी उपसभापती रघुनाथ माळी, शिक्षिका सपना पाटील, भावना पाटील, योगिता चौरे, अनिल जोशी, शेख सर आदी उपस्थित होते. उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने अतिशय स्तुत्य उपक्रम राबवले जात असून असेच कार्यक्रम इतर शाळांमध्ये घेऊन किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन करण्याचे आवाहन शेलार यांनी केले आहे.

पान १ वरून...

## फाटक्या संसारातील वाद विकोपाला...

केले सोन्यासारखी दोन मुले आहेत. त्यातच आनंद मानून ती गरिबीवर मात करायची गरिबीमुळे घर भागत नव्हते पैसे आण म्हणून पती वारंवार त्रास द्यायचा माहेरची मंडळी मदत करायचे तरीही संसाराला पुरत नव्हते यातूनच मानसिक त्रास असह्य झाल्याने पतीकडून सतत भांडणे व्हायची हा त्रास तिने सतत भोगला पण बुधवारचा दिवस तिच्यासाठी अखेर काळ ठरला. कडाक्याच्या भांडणातून पतीने पत्नीच्या वायरने गळा आवळून खून केला आणि वीस वर्षाचा दोघांचा संसार मोडून पडला हा क्रूर प्रसंग आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी जवळच्या यत्नाळ गावातील ही घटना रेखा शरणबसप्पा हिरोळे (वय ३४) असे मृत पत्नीचे नाव असून पती शरणबसप्पा महादेव हिरोळे (वय ४०) याला वळसंग पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. हिरोळे कुटुंबाची परिस्थिती बेताची होती आर्थिक चणचण भासत होती संसाराचा गाडा हाकण्यासाठी पैसे कमी पडत होते. यामुळे पती-पत्नीत सतत भांडणे व्हायची तिला सतत मारहाण होत होती. पैशासाठी जावई शरणबसप्पा हा सतत सासू-सासऱ्याकडे पत्नीमार्फत तगादा लावायचा सासू-सासरे दिंडूर गावात राहत होते. मृत रेखा हिचा भाऊ ओमान या देशात नोकरीला आहे. सासू-सासरे नेहमी पाच ते दहा हजार रुपयांची मदत रेखा आणि शरणबसप्पा यांना करत होते. मेहुणा ओमान देशातून बहिणीला आर्थिक मदत करत होता. शरणबसप्पा हा रोजनदारीवर मजुरीचे काम करत होता. त्यामुळे पती-पत्नीत पैशाच्या कारणावरून सतत कुरबुर होत होती. संध्याकाळी स्वतःहून सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर होऊन त्याने खून केल्याची कबुली दिली. एमआयडीसी पोलिसांनी हद्द पाहून विडी घरकुल चौकी कुंभारी गावाकडे पाठवून दिले. त्यानंतर वळसंग पोलिसांनी आरोपी शरणबसप्पा याला ताब्यात घेऊन घटनास्थळी धाव घेतली. रात्री नऊ वाजल्यापासून गुरुवारी पहाटेपर्यंत पोलिसांनी पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला व रेखाच्या आई-वडिलांना घटनेची माहिती दिली. गुरुवारी शरणबसप्पा याला कोर्टात हजर केल्यानंतर ३ फेब्रुवारीपर्यंत त्याला पोलीस कोठडी देण्यात आली आहे. त्याच्यावर ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून , पुढील अधिक तपास वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले हे करीत आहेत , अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावर यांनीही घटनास्थळी भेट दिलेली आहे. दरम्यान गावभर फिरला शरणबसपा आणि रेखा यांच्यात बुधवारी सकाळी कडाक्याचे भांडण झाले होते शरणबसप्पा हा सकाळीच सात वर्षाच्या मुलीला बहिणीकडे सोडून आला दुपारी पुन्हा रेखा आणि शरणबसप्पा यांच्यात जोरदार भांडण झाले. रागाच्या भरात शरणबसप्पाने रेखा हिचा इलेक्ट्रिक वायरने गळा आवळला सुटका होऊ नये यासाठी वायरने पिळ्या मारल्या त्यातच तिचा तडफडून जीव गेला पत्नीला संपवल्यानंतर शरणबसप्पा याने मृतदेहावर चादर घातली आणि घरातील पंखा फास्ट लावला बाहेरून कडी लावून गावभर फिरला आणि पोलीस ठाण्यात हजर झाला.

## तीन वर्षांच्या तुरुंगवासामुळे सुडाने ...

या अपराधीक कृतीबाबत शिवडी पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्तीच्या विरोधात दिनांक २४ जानेवारी २०२४ रोजी गु.र.क ३६/२०२४, कलम ३०२, २०१ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्हयाचे घटनास्थळ हे दिवसा कमी वर्दळीचे, रात्रीचे वेळी निर्मनष्य असे असून मयत महिलेचा मृतदेह हा कुजलेल्या, चेहरा विच्छन्न अवस्थेत असल्याने तिला ओळखणे व गुन्हा उघडकीस आणणे हे आव्हानात्मक होते. परंतु वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली शिवडी, वडाळा व यलोगेट पोलीस ठाणेची एकूण ८ पोलीस पथके तयार करण्यात आली. या पथकाकडून मयत महिलेचे ओळख पटविणे करीता एकूण १६२ हरविलेल्या महिलांची तपासणी करण्यात आली, मयत महिलेच्या अंगावर मिळून आलेला ऐवजा प्रमाणे शोध प्रत्रिका तयार करण्यात आली. दक्षिण प्रादेशिक विभाग, मध्य प्रादेशिक विभाग व पुर्व प्रादेशिक विभातील सर्व पोलीस ठाणेच्या हद्दीत एकूण १,००० शोध प्रत्रिका चिटकविण्यात येवून व माहिती देवून प्रसिध्द करण्यात आली होती. सातत्याने तपास करून प्राप्त माहितीच्या आधारे मयत महिला ही वारंगणा किंवा रोडसाईड असण्याची शक्यता असल्याने वेश्या व्यवसाय करणाऱ्या व रोडवर राहणाऱ्या एकूण २०० पेक्षा अधिक महिलांची भेट घेवून त्यांना मयत महिलेची व तिचे जवळील ऐवजाची माहिती व शोध प्रत्रिकेचे वाटप करण्यात आले. मात्र त्याचंही काही उपोयोग झाला नाही. दरम्यान मयत महिलेची ओळख पटविणे करीता कसोशिने प्रयत्न करण्यात येत होते. अशाच तपास सुरू असताना मिळालेली गोपनीय माहिती व तांत्रिक माहितीच्या आधारे मयत महिलेची ओळख पटवण्यात आली. मुंबई सेन्ट्रल परीसरातून सदरची मयत महिला हिचे नाव श्रीमती सपना सतिश बातम (वय ४०) असल्याचे समजून आले. पोलिसांनी तिची मुलगी सोनी हिचे मार्फतीने मयत महिलेची ओळख पटवून तो मृतदेह तिच्या ताब्यात दिला. त्यानंतर तपास सुरू झाला. पोलिसांनी तपास करून आरोपीचा शोध घेतला. त्यानंतर संशयीत आरोपी शेहजादा उर्फ रमजान शफि शेख (वय ३७) रा. बरकत अली दर्गा रोड, डोंगराचे वर मुंबई महानगर पालीका कार्यालयाचे जवळ, वडाळा (पुर्व), मुंबई ३७ याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केली असता, गुन्ह्याची माहिती पुढे आली. शेहजादा उर्फ रमजान शफि शेख याने २०११ साली मयत महिला सपना सतिश बातम हिच्या मुलीचे अपहरण केले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल होऊन त्याला अटक झाली. या गुन्ह्यात तो तीन वर्षे तुरुंगात होता.तो राग त्याच्या डोक्यात होता.तो तुरुंगातून बाहेर आल्यानंतर गुन्हयाचा आठवड्याभरापूवी मयत महिला सपना हिला दारू पाजण्याचे बहाण्याने मोटार स्कुटर वर बसवून पीसीएल कंपनीचे पाठीमागे, टिकटॉक पाईन्ट, या ठिकाणी गर्द झाडीमध्ये घेऊन गेला. दारू पिल्यावर पूर्वीच्या घटनेवरून दोघांमध्ये भांडण झाले. समोरच पडलेला दगड उचलून झालेल्या भांडणात तिला दगडाने ठेचून जिवे ठार मारले. तसेच तिची ओळख पटू नये याकरीता तिचा चेहरा नष्ट केला व मयत महिलेचे पुर्ण शरीर हे प्लास्टिकने झाकून त्यावर लाकडी काडया व प्लायवूड ठेवून गुन्हयाचे घटनास्थळावरून पळून गेला. अशा प्रकारची माहिती आरोपी ने पोलिसांजवळ दिली. अशा प्रकारे गुन्हयात अनोळखी मयत महिलेच्या बाबत कोणतीही स्पष्ट अशी माहिती नसताना, प्रत्यक्ष गुन्हा घडल्याचे बाबत माहिती सांगणारे कोणीही उपलब्ध नसताना तसेच उपलब्ध माहितीच्या आधारे सातत्याने प्रयत्न करून आरोपी शेहजादा उर्फ रमजान शफि शेख याला अटक करण्यात यश प्राप्त झाले आहे.ही कामगीरी मा. सत्यनारायण चौधरी, सह पोलीस आयुक्त (का व सु), मुंबई, मा. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग संजय लाटकर, पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ मुंबई, मा. विजय भिसे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वडाळा विभाग, रोहीत खोत, व.पो.नि, शिवडी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल चंदनशिवे, शिवाजी पासलकर, सचिन माने, स.पो.नि. सागर काळेकर, स्नेहलसिंग खुळे, विश्राम मदने, पोलीस उप निरीक्षक शिव धुमाळ, रनावरे, वाल्मीक महाजन, स.पो.उप. नि सुनिल कळविकट्टी, पो.हवा.गायकवाड,कदम, यादव, बागवाण, कासार, पो.हवा. घाडगे, पो.शि.क साळेकर, धायगुड, साळवे, जमादार,शेख, जाधव, आठरे, काटकर, पाटोळे, बाबर, खारे, बडे यांनी पार पाडलेली आहे.

## दारूच्या नशेत चौघेही खूपच...

गावातच त्याचा नात्याने चुलत मावस भाऊ तसेच साडभाऊ धनराज सावंत रहातो. दि. १० डिसेंबर रोजी धनराज आणि सौरव या दोघा साड भावांनी आसलगाव येथे जेवणाचा प्लॅन आखला. ठरल्याप्रमाणे धनराज व सौरभ जेवणासाठी संध्याकाळी ७ वाजता आसलगावला आले. 'याने त्याचा चुलत भाऊ भाऊराव सावंत यासही जेवणासाठीबोलावल्याने भाऊराव हा त्याचा साला तेजराव सोळंकेयास घेऊन आला. आसलगावच्या एकाहॉटेलवर सौरव, धनराज, भाऊराव आणि तेजराव यांचे रात्री ८ नंतर शराबीचे 'जहाँ चार यार मिल जाए, वही रात हो गुलजार' सुरू झाले. गप्पा करत चौघांनी पेगमागे पेग पोटात रिचवले. नशेचा अंमल वाढू लागला. मग जेवण मागवण्यात आले. जेवण- खाणे आटोपून गप्पा-गोष्टी करत ते रात्री दहाच्या दरम्यान हॉटेल बाहेर येण्यासाठी निघाले. चौघेहीदारूच्या नशेत झिंगत होते. त्यातच त्यांना पान खाण्याची इच्छा झाली. ते पानाच्या ठेल्याकडे निघाले. इतक्यात तेजरावचा हात धनराजच्या हातातील मोबाईलला लागला, त्यामुळे धनराजचा मोबाईल खाली पडला आणि क्रॅक झाला. आपला मोबाईल पडल्याने पाहून खरे तर धनराजला राग यायला हवा होता. त्याने तेजरावला जाब विचारायला हवा होता, पण क्षणभर तो गप्पच राहिला, कारण तेजराव हा धनराजचा नात्याने चुलत साला असल्यामुळे त्याला बोलायचे कसे या विचारात तो होता. इतक्यात सौरवनेच तेजरावच्या कानशिलात सणसणीत लगावली. अचानकहा प्रकार झाल्याने तेजराव आणि धनराज दोघेही स्तब्ध झाले. तर आपल्या साल्याच्या कानशिलात मारल्याने भाऊराव खवळला. तो सौरवला शिवीगाळ करू लागला. हॉटेलबाहेरच शाब्दिक युद्धाची चौरंगी लढत सुरू झाली. काही वेळाने चौघांनीही स्वतःहून भांडण आवरते घेत घराकडे निघण्याचा निर्णय घेतला. वाद करणारे सौरव व तेजराव एका दुचाकीवर तर धनराज वभाऊरावदुसऱ्या दुचाकीवर निघाले. रस्त्याने दुचाकीवरून जातांनाही त्यांची एकमेकास अश्लील शिवीगाळ सुरूच होती.वाद काही संपत नव्हता. सुलज गावाजवळ दोन्ही दुचाकी अचानक थांबल्या, परत त्यांची शाब्दिक चकमक सुरू झाली. शाब्दिक चकमकीचे रूपांतर हाणामारीत झाले. 'दारू पिऊन जास्त बोलतोस' असे म्हणून त्या तिघांनी सौरवला चांगलाच धुतला. कोण कोणाशी वाद करतोय ? हे त्या चौघांनाही दारूच्या नशेत समजत नव्हते. रात्री साडेदहाची वेळ होती. त्या चौघांची हाणामारी सुरू असतांना त्यांच्याजवळ एक ऑटो थांबली. त्यात गावी जाणारे लोक होते. त्यातील एका महिलेने त्या चौघांनाही ओळखले. तिने ऑटोतूनच त्यांना 'वाद करू नका' असे समजावले, पण दारूच्या नशेत त्या चौघांना काहीच समजत नव्हते. त्यांना बोलून काही उपयोग नाही हे लक्षात आल्याने ती महिला निघून गेली, पण तिने गावात गेल्यानंतर हा सगळा प्रकार सौरवच्या घरी सांगितला. त्या महिलेने माहिती दिल्याने तेवढ्या रात्री सौरभची आई व बहीण मोटरसायकलने सुलज गावाजवळ आले. त्यांनी धनराज, सौरव, तेजराव, भाऊराव यांच्यातील वाद आवरला. त्यामुळे धनराज, भाऊराव, तेजराव तिघेही एका दुचाकीवर बसून मोहिदेपूरकडे निघाले तर त्यांच्यामागे काही अंतरावर सौरव निघाला. सौरभच्या मागे दुचाकीने त्याचे भाऊ, बहीण व आई निघाले. सौरवची आई व बहीण यांना तहान लागल्याने ते पळशी सुपो येथे पाणी पिण्यासाठी थांबले. वाद करणाऱ्या त्या चौघांच्या दोन दुचाकी पुढे निघून गेल्या. पाणी पिल्यावर सौरवचा आई, बहीण दुचाकीने भाऊ, निघाल्यावर त्यांच्या पुढे मेंढरांचा कळप आला, त्यामुळे ते काही काळ थांबले. पुढे गेलेल्या त्या चौघांमध्ये परत पळशी सुपो गावच्या पुढे वाद सुरू झाला. धनराज, भाऊराव, तेजराव तिघांनी लाथा-बुक्क्यांनी सौरवला बेदम मारहाण केली. इतकेच नाही तर त्याच्या कपाळावर धारदार चाकूने वार केले. त्याला रक्तबंबाळ करून त्या चौघांनी तिथून पळ काढला. दहा मिनिटात हा थरारक प्रकार घडला, घाव वर्मी लागल्याने तडफडत सौरव रक्ताच्या थारोळ्यात गतप्राण झाला. मेंढ्यांचा कळप निघून गेल्याने मोहीदेपुरकडे दुचाकीने निघालेल्या सौरवचे भाऊ, आई, बहीण यांना वाटेत सौरव रस्त्याकडेला पडलेला दिसला. सौरभच्या आई व बहीणीने त्या निर्मनुष्य ठिकाणी एकच हंबरडा फोडला. गावातील इतर नातेवाईकांना बोलावून सौरवला उपचारासाठी रात्री एक वाजण्याच्या दरम्यान खामगाव दाखल करण्यात आले. खामगाव येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सौरवला मृत घोषित केले. दुसऱ्या दिवशी ११ डिसेंबर रोजी सौरवच्या आईने जळगाव जामोद पोलीस स्टेशन गाठून फिर्याद दाखल केली, त्यानुसार जळगाव जामोद पोलिसांनी मृतक सौरव विजय शिंदे (वय २२) यांच्या खूनप्रकरणी संशयित आरोपी धनराजशेषराव सावंत, भाऊराव बाबुराव सावंत, तेजराव दादाराव सोळंके या तिघांवर अपराध नंबर ७०९/२३ कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी वेळ न दवडता तीनही आरोपींना ताब्यात घेतले. सौरव यास जेवणासाठी बाहेर घेऊन गेल्यावर धनराजने चुलत भाऊ भाऊराव व त्याचा साला तेजरावला का बोलावले? मोबाईल खाली पडल्याच्या कारणावरून खून होईल का? जेवणासाठी आल्यावर आरोपींनी चाकू सोबत का आणला? सौरव शिंदे खून प्रकरणात आणखी काही गुपित तर नाही ना? असे विविध प्रश्न या खून प्रकरणात अजूनही अनुत्तरित आहेत. न्यायदेवता आरोपींना काय सजा देईल ते येणाऱ्या काळात समजेल. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी देवराव गवळी, पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे, पोलीस उपनिरीक्षक नारायण सरकटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग इंगळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल उमेश शेगोकार, पोलीस कॉन्स्टेबल सचिन राजपूत, विशाल कळसकर करत आहेत.

## प्रियकरावर तिने जीव ओवाळून ...

यांचे लहानपणापासून प्रेमसंबंध होते. या प्रेमात चंद्रप्रकाशचा अडथळा येत होता. त्यामुळे त्याला मारण्याचा कट मागील चार महिन्यांपासून रिता आणि सुमित करत होते, असे पोलिसांनी सांगितले. आडिवली येथील विद्याधर वझे यांना आपल्या विहिरीत मृतदेह असल्याचे आढळले. त्यांनी पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी हा मृतदेह चंद्रप्रकाश याचा असल्याची खात्री केली. पोलिसांनी चंद्रप्रकाशची पत्नी रिता हिची सखोल चौकशी केली. ती उडवाउडवीची उत्तरे देत होती. पोलिसांनी तिला विश्वासात घेऊन चौकशी केली. तिने आपण आपला प्रियकर सुमित याच्या सहकार्याने आणि इतर दोन अल्पवयीन मुलांच्या साहाय्याने ही हत्या केल्याची कबुली दिली. चंद्रप्रकाशला निर्जन स्थळी मोटारीतून नेऊन तेथे त्याची गळा दाबून हत्या करण्यात आली. त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले. त्याचा मृतदेह कोणाला दिसू नये म्हणून त्याला ८० किलो वजनाचा अवजड दगड बांधून तो मृतदेह वझे यांच्या विहिरीत फेकून देण्यात आला, असे विश्वकर्माने पोलिसांना सांगितले. अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. प्रेमासाठी पतीची एवढ क्रूरपणे हत्या करणाऱ्या पत्नी विषयी परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. लोवंशी कुटुंब दावडी परिसरात राहत होते.

पान ८ वरून....

## महानाट्य आणि महासंस्कृती...

महोत्सवांमध्ये ऐतिहासिक वस्तूचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. विरार येथील कलाकृती इन्व्हेंट कंपनी ही संस्था ऐतिहासिक शस्त्र प्रदर्शन, नाणी प्रदर्शन, मोडी लिपीतील पत्रांचे प्रदर्शन तसेच ऐतिहासिक दुर्मिळ वस्तूंचे प्रदर्शन दि. ७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीमध्ये सकाळी १० ते रात्री १० यावेळेत आयोजन करणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी महानाट्य व महासंस्कृती महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे अवाहन जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी केले.

## वेठबिगार मुक्तीतून सुटलेल्या...

प्रमाणावर ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी मजूर काम करीत असताना अनेक वीटभट्टी मालकां कडून या आदिवासी मजुरांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन त्यांना वर्षावर्षे कमी मोबदला देऊन वेठबिगारी म्हणून राबवून घेतात.त्या माध्यमातून आर्थिक व शारीरिक पिळवणूक या समाजाची होत असल्याने श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून अशा मुजोर वीटभट्टी मालकां विरोधात वेठबिगर मुक्ती कायद्याच्या आधारे गुन्हे दाखल केले गेले आहेत.या वेठबिगारीतून मुक्त होणाऱ्या आदिवासी मजुरांचे पुनर्वसन शासन निर्देशानुसार होत नसल्याने श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय आदिवासी समाज विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी नापसंती व्यक्त करीत. अशा मुक्त झालेल्या कामगारांना तात्काळ आर्थिक मदती सह त्यांना घरकुल व त्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची असून त्याची तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी विवेक पंडित यांनी केली आहे.

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर...

डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीपती मुंढे तर मंचावर प्राचार्य जी. आर. मुंडे व मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. माले म्हणाले, निरोगी आरोग्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वच्छता राखावी, मानसिक ताण घेऊ नये, संतुलीत आहार घ्यावा, शुध्द हवा घ्यावी, सकाळी योगा व प्राणायाम करावा, यामुळे रोगप्रतिकार शक्ती वाढते. उघड्यावरील अन्नपदार्थ खाऊ नये. आपल्यासह आपल्या कुटुंबियाच्याही आरोग्याची काळजी घ्यावी. त्यांना तंबाखू व दारूमुक्त करून घरावर 'तंबाखू व दारूमुक्त घर' असा फलक लावावा. मोबाईलवर अनावश्यक गोष्टी न पाहता आरोग्यविषयक बाबी सर्च करून त्या पाहाव्यात, असे सांगून त्यांनी या संकुलात राबविण्यात येणार्या उपक्रमांचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, शिक्षण क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले आहेत. लातूर ही शिक्षणाची पंढरी बनली आहे. येथे अभ्यासाची निकोप स्पर्धा सुरू आहे. लातूरने पुण्याला शिक्षणात मागे टाकले आहे. सध्याचे युग स्पर्धेचे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी व अभ्यासात सातत्य ठेवावे. यामुळे तुम्हाला तुमचे ध्येय नक्की गाठता येईल. यासाठी आपले आरोग्य जपावे, असा सल्लाही त्यांनी शेवटी विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका केंद्रे यांनी संकुलाचा निकाल व विविध उपक्रमांची माहिती नमूद केली. या शिबिरासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपलब्ध करून दिल्याबद्दल एमआयटीचे कार्यकारी संचालक आमदार रमेश कराड यांचे त्यांनी आभार मानले. यावेळी संकुलातील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी देण्यात आली. सूत्रसंचालन एस. बी. शिंदे यांनी केले तर पाहुण्यांचे आभार व्ही. व्ही. लोहारे यांनी मानले.

## अपघातात मृत्यू झालेल्या सिध्दी...

केले. त्यामुळे सिध्दी या जगात नसली तरी तिच्या डोळ्यांनी ती दोन अंधांच्या आयुष्यात प्रकाश देऊन त्यांच्या रुपाने जग पाहणार आहे. सिध्दीचे शालेय शिक्षण याच शाळेत झाले होते. सध्या ती कम्प्युटर सायन्सच्या पदविकेच्या शेवटच्या वर्गात शिकत होती. तिची आई गृहीणी आहे तर वडील हे मुंबई पोलिसांच्या शस्त्रास्त्र विभागात हेड कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत आहेत. या घटनेची सखोल चौकशी विरार पोलिसांकडून केली जात आहे. पोलिसांनी चालकाला कलम ३०४ (अ), २९७, ३३७. ३३८ तसेच मोटर वाहतूक कायद्याच्या कलम १८४ अन्वये अटक केली आहे. बुधवारी त्याला वसईच्या सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. नरसिगं गोविंद वर्तक शाळेने स्वाती ट्रॅव्हल्स या खासगी कंपनीकडून सहलीसाठी ११ बसेस भाडेतत्वावर घेतल्या होत्या. यासंबंधीचा करार, शाळेची भूमिका ठेकेदाराने नियमांचे पालन केले होते की नाही याचा तपास केला जाणार असल्याची माहिती या प्रकरणाचा तपास करणारे विरार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब डुबे यांनी सांगितले. या घटनेमुळे आम्ही प्रचंड दुःखात आहोत. या प्रकरणी आम्ही सीसीटीव्ही चित्रण पोलिसांना दिले असून तपासात जे काही सहकार्य लागेल ते करण्यास तयार आहोत असे शाळेचे विश्वस्त विकास वर्तक यांनी सांगितले.

## शहापूर येथील आश्रमशाळेतील...

नीलिमा चव्हाण यांच्याकडे लेखी निवेदन दिले. यावेळी प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी पवन पाटील, आदिवासी संघटनेचे नारायण केवारी उपस्थित होते.

## गांधीजींच्या स्मारकाकडे दुर्लक्ष...

माजी सरपंच टोनी डाबरे व प्रदेश सरचिटणीस अम्मार पटेल, प्रदेश सचिव आमिर देशमुख, वसई विरार जिल्ह्याचे कार्याध्यक्ष संदीप किणी, कार्यकर्ते मकसूद पटेल व हेमंत किणी आणि इतर सहकारी उपस्थित होते.

# भिवंडीत गोदाम विकासकाच्या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांचे साखळी उपोषण सुरू




भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी तालुक्यात फोफावलेल्या गोदाम व्यवसायातून शेतकऱ्यांना फसवणुकीचे प्रकार सुध्दा मोठ्या प्रमाणावर उघड होत आहेत. तालुक्यातील वाशेरे गावातील शेतकऱ्यांना विकासकाने मागील चार वर्षापासून भाडे दिले नसून गोदामांचा ताबा ही देत नसल्याने हवालदिल झालेल्या शेकडो शेतकऱ्यांनी साखळी उपोषण मागील चार दिवसांपासून सुरू केले आहे. पडघा कल्याण रस्त्यावरील वाशेरे आमणे या गावातील सुमारे दोनशे एकर जमीन रेनिसेंस इंडस इन्फ्रा प्रा.ली.या कंपनीने शेतकऱ्यां सोबत काही जमीन विकत घेत सुमारे दोनशे एकर शेतजमीन विकसित करण्याच्या करारावर २००७ ते २०१२ दरम्यान घेतली. जमिनीच्या शासकीय व्यवहारासाठी शेतकऱ्यांकडून कुलमुखत्यार पत्र बनवून घेतले .या कागदपत्रांच्या आधारे विकासक कंपनीने येथील शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण ठेवून द डिझाईन इंडिया ग्रुप कडून कोट्यावधी रुपयांचे कर्ज घेतले.परंतु त्यानंतर प्रोजेक्ट डबघाईस आल्याने कंपनी दिवाळखोरीत निघाली. त्यामुळे शेतकऱ्यांना मागील पाच वर्षा पासून त्यांच्या जमिनीचे भाडे देणे कंपनीने बंद केले. जमिनीचा ताबा ही दिला जात नाही. कंपनी दिवाळखोरीत निघाल्याने फेब्रुवारी २०२३ मध्ये Interim Resolution Professional म्हणून विरेंद्र अग्रवाल यांची नेमणूक दोघांमध्ये समेट घडवून आणण्यासाठी करण्यात आली .परंतु शेतकरी सुरवातीला कंपनीकडे व त्यानंतर वीरेंद्र अग्रवाल यांच्या कडे भाडे व गोदामांच्या ताब्यात संदर्भात विनंती करीत राहिले. परंतु त्यास संबंधितांकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने शासन प्रशासन लोकप्रतिनिधी यांच्याकडे खातेदार असलेल्या सुमारे दीडशे शेतकऱ्यांकडून अर्ज विनंती करून न्याय देण्याची मागणी केली जात आहे. परंतु त्यास कोणाकडून ही सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याने अखेर हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी २९ जानेवारी पासून वाशेरे गावात रेनिसेंस इंडस इन्फ्रा प्रा.ली. या गोदाम संकुलाच्या प्रवेशद्वारा शेजारी साखळी उपोषणास सुरवात केली आहे. शेतकऱ्यांवर गोदाम विकासकाने केलेल्या फसवणुकी मुळे भाडे मिळत नाही तर गोदामांचा ताबा ही दिला जात नाही यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण बिघडले असून, शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी वरील गोदामात वाराई काम करू देण्यास मज्जाव केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याकडे शासनाने वेळीच लक्ष देवून आमच्या जमिनी आमच्या ताब्यात मिळवून द्याव्यात अन्यथा उग्र आंदोलन केले जाईल असा इशारा दिलीप केणे यांनी दिला आहे.या आंदोलन ठिकाणी भिवंडीत नायब तहसीलदार विशाल इंदुलकर यांनी भेट देऊन शेतकऱ्यांची संबंधित गोदाम विकासक यांच्या सोबत बैठक घडवून आणण्याचे आश्वासन दिले आहे.

# वाड्यातील नागरिकांनी अनुभवला कबड्डीचा थरार



वाडा/प्रतिनिधी

आपल्या पारंपरिक खेळाचे महत्व अधोरेखित राहावे आणि नवयुवकांमध्ये उत्साह निर्माण व्हावा यासाठी वाडा तालुका काँग्रेस कमिटी तर्फे महिला मेळावा, हळदीकुंकू समारंभ व भव्य कबड्डीचा महासंग्राम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आमदार तथा कार्याध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी प्रणिती शिंदे यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. प्रणिती शिंदे यांच्या उपस्थितीमुळे स्थानिक पातळीवर महिलांचा सहभाग वाढला शिंदे यांनी महिलांसी समन्वय साधून, त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांना योग्य मार्गदर्शन केले. कबड्डी स्पर्धेत एकूण ६० संघांनी सहभाग घेतला होता मात्र केवळ १६ संघाना समाविष्ट करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. या स्पर्धामध्ये तालुक्यात नावाजलेल्या कुलदैवत खानिवली संघाने प्रथम क्रमांक पटकावला तर नित्यानंद खरिवली संघाने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. लवकुश बोईसर संघाने तृतीय तर अष्टभुजा रानगावं (वसई) संघाने चतुर्थ क्रमांकाचे बक्षिस मिळवले. सदर प्रसंगी आमदार विनोद निकोले, काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रफुल पाटील, काँग्रेस किसान प्रदेश अध्यक्ष पराग पष्टे, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक संचालक तथा काँग्रेस सहकार सेल सरचिटणीस निलेश वसंत भोईर, काँग्रेस प्रदेश सचिव मनिष गणोरे, प्रदेश सचिव ओबीसी विभाग जितेश विशे, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अरविंद क्षेत्रीय, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष बळवंत गावीत, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ वेखंडे, जिल्हा सरचिटणीस प्रल्हाद सावंत, जिल्हा सरचिटणीस कैलास पाटील, महिला जिल्हाध्यक्ष शरयु औसरकर, जिल्हाध्यक्ष ठाणे ग्रामीण ओबीसी विभाग तुषार देसले, नगरसेविका भारती सपाटे, माजी नगरसेविका विशाखा पाटील, तालुकाध्यक्ष दिलीप पाटील, शहर अध्यक्ष सुशील पातकर, ग्राहक सेल जिल्हाध्यक्ष सुनंदा बेलकर, गणेश बाराठा, मोहीत पाटील, प्रदेश सेवादल सचिव लोकेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सचिन शिंगडा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे १४ विद्यार्थी गणित प्रज्ञा परीक्षेसाठी पात्र




अहमदपूर/फिरोज शेख

संत ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या १४ विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत यश संपादन केले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव प्राचार्य रेखाताई तरडे हाके तर प्रमुख अतिथी म्हणून गणित अध्यापक मंडळाचे जिल्हा सदस्य तथा गणित तज्ञ विजयकुमार किलचे, सदस्य शिवानंद उंदीरकल्ले, सदस्य जिलानी शेख, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तौर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. अत्यंत कठीण असलेल्या या परीक्षेस पाचवी चे एकूण ३० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १४ विद्यार्थी ११ फेब्रुवारी रोजी लातूर येथे होणाऱ्या गणित प्रज्ञा परीक्षेसाठी पात्र ठरलेले आहेत. त्यात तेजल हरिहर सोनवणे, आराध्या उमाकांत लांडगे, अनुष्का बाबुराव नेळगे, मयूर ज्ञानेश्वर उपलवाड, आराध्या अविनाश राठोड, संकर्षण गोपाळ पलमटे, आनंदी मनोज कदम, यशस्वी देवानंद सूर्यवंशी, प्रसाद सतीश बैकरे, अमृता जयपद्मम वजीर, श्रेयश अमोल देशमुख, ज्ञानेश्वरी रमेश सूर्यवंशी, जान्हवी दत्तात्रय डांगे, आर्या भानुदास दुधाटे यांचा मान्यवरांच्या हस्ते पालकांसह सत्कार करण्यात आला. गणित तज्ञ शिवानंद उंदीरकल्ले व विजय कुमार किलचे यांचे मार्गदर्शनपर भाषणे झाली. उपस्थित पालकांच्या वतीने गोपाळ पलमटे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य रेखाताई हाके यांनी शिक्षक, विद्यार्थी व पालकांचे कौतुक केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्राजक्ता भोसले, सविता पाटील यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते.या नेत्रदीपक यशाबद्दल श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेश दादा हाके पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा मानसीताई हाके सह पालक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आशा रोडगे यांनी केले. सूत्रसंचालन सतीश साबणे यांनी केले तर आभार प्राजक्ता भोसले यांनी मानले.

# ३४ वर्ष सत्ता असूनही नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास सत्ताधारी अपयशी -समीर वर्तक



वसई/प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे जूचंद्र, ता. वसई येथे जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन आगरी समाजाचे नेते, काँग्रेसचे जेष्ठ नेते व सामाजिक कार्यकर्ते दयानंद गावडे यांच्या हस्ते आज रविवार दि. २८ जानेवारी रोजी संपन्न झाले. हा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे पर्यावरण विभागाचे प्रदेशप्रमुख समीर सुभाष वर्तक ह्याच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी विकास पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वसई विरार जिल्हा काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष संजय पाटील आणि जिल्हा सचिव संदेश भोईर यांच्या पुढाकाराने जूचंद्र येथील जनसंपर्क कार्यालय सुरू झाले आहे. उद्घाटन प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना समीर वर्तक यांनी देशातील व राज्यातील सामाजिक व राजकीय परिस्थितीबद्दल माहिती देताना वसई विरारमधील नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध आहे असे सांगितले. ते म्हणाले येथील सत्ताधारी ३४ वर्ष सत्ता असूनही नागरिकांचे प्रश्न सोडवण्यास ते अपयशी ठरले आहेत. ही सर्व कामे पूर्ण करण्यासाठी प्रत्येक काँग्रेस कार्यकर्त्याने परिश्रम घेतली पाहिजे. संजय पाटील यांनी सर्वांचे आभार मानले. महाराष्ट्र काँग्रेसच्या पर्यावरण विभागाच्या या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी पर्यावरण विभागाचे प्रदेश सरचिटणीस टोनी डाबरे, अभिजित घाग व अम्मार पटेल, प्रदेश सचिव आमिर देशमुख, वसई विरार जिल्हा काँग्रेसचे जिल्हाप्रमुख डेरीक फूर्ट्याडो, सरचिटणीस अश्रफअली मलिक, राष्ट्रवादी काँग्रेसचे वसई तालुका अध्यक्ष नितीन म्हात्रे, वसई विरार जिल्हा युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष संदीप कानोजिया, भारतीय विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष साबीर शेख, सेवादलचे जिल्हा उपाध्यक्ष आलम अन्सारी, वाणिज्य काँग्रेसचे जिल्हाप्रमुख अश्रफभाई, पर्यावरण विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष संदीप किणी, उपाध्यक्ष कायस फर्नांडीस, तारिक खान व आमिर सय्यद, जिल्हा सरचिटणीस जमील देशमुख, कुंदन नाईक, संकेत वसईकर, मॅकनोबल डिक्रूझ, राहुल देवकर, लॉरेन्स दोडती, जूचंद्र मधील सुनील डावरे, अशोक गुरव, नरेंद्र भोईर, ओमकार, मकसूद पटेल, देवा तरे, दिनेश कुडू, लुकस पिंटो, रोशन वझे आणि कार्यकर्ते व गावातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोहित पवारांच्या ईडी चौकशी विरोधात भिवंडी राष्ट्रवादीची निदर्शन




भिवंडी/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या बारामती ग्रो कंपनीच्या गैरव्यवहारा संदर्भात ईडी कडून मुंबई येथे गुरूवारी पुन्हा चौकशीसाठी बोलावण्यात आले. या घटनेचा राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाकडून तीव्र निषेध आंदोलनाच्या माध्यमातून केला जात आहे. भिवंडीत शहराध्यक्ष शोएब खान गुड्डू यांच्या नेतृत्वाखाली शहर कार्यालया बाहेर ईडी प्रशासना सह राज्य व केंद्र सरकारच्या निषेधाच्या घोषणा देत आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात माजी उपमहापौर इमरान वली मोहम्मद खान, हलीम अन्सारी, युवक अध्यक्ष हारून खान, महिला अध्यक्षा शहाजहा अन्सारी या सोबतच पक्ष पदाधिकारी सुरेंद्र मुळे, अभिजित सकपाळ, इस्माईल मिर्ची, युसुफ सोलापूरकर, ग्यासुद्दिन अन्सारी, रसूल खान, मुमताज अन्सारी, अरूण पवार, वैशाली पाटील यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# जैन इरिगेशनच्या सहकाऱ्यांकडून महात्मा गांधीजींना श्रद्धांजली!



जळगाव/प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जैन इरिगेशनच्या सर्व आस्थापनांमध्ये शांती सभेतून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महात्मा गांधी यांनी आपल्या कृतिशील आचरणातून व विचारांतून राष्ट्रालाच स्वतंत्र केले नाही तर संस्कारशील नागरिकत्वातून राष्ट्र निर्माणाची आत्मप्रेरणा दिली. यातून सर्वोदय ही संकल्पना समोर आली. महात्मा गांधीजींनी दिलेला अहिंसेचा संदेश प्रत्येकाच्या मनात आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त हुतात्मा दिन ही पाळला जातो. स्वदेशी व स्वावलंबनाच्या मार्गाची शिकवण देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या जीवन चरित्राचा तरुणांना, येणाऱ्या पिढीला अभ्यास करता यावा, यासाठी श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी गांधीतीर्थची निर्मिती केली. महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त गांधी रिसर्च फाऊंडेशनसह जैन इरिगेशनमधील सर्व आस्थापनांमधील १०,००० हून अधिक सहकाऱ्यांनी त्यांना अभिवादन केले. यावेळी जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चे अध्यक्ष अशोक जैन सुद्धा सहभागी झाले होते. कंपनीच्या मुख्यालयासह भारतातील सर्व कार्यालयांमध्ये सायंकाळी ५.१७ वाजता सर्व सहकाऱ्यांनी स्तब्ध उभे राहून राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# कुडूस येथे शांतता व मोहल्ला कमिटीची बैठक



वाडा/प्रतिनिधी

वाडा पोलीस ठाणे येथे काही दिवसांपूर्वी कार्यभार स्वीकारलेले पोलीस निरीक्षक रणवीर बयेस यांनी गुरुवारी (दि.१फेब्रुवरी) कुडूस पोलीस दुरक्षेत्र येथे विशेष बैठकीचे आयोजन केले होते. तालुक्यात शांतता व सुव्यवस्था कायम राखणे व सर्वसमान्यांच्या अडी अडचणी जाणून घेण्याच्या उद्देशाने मोहल्ला कमिती व शांतता कमिटीची बैठक बोलावण्यात आली होती. याप्रसंगी नागरिकांनी मांडलेल्या वाहतूक कोंडी, आठवडी बाजार व वाढत्या चोऱ्यांबाबत चर्चा केली तर बयेस यांनी या समस्यांकडे प्रमुख्याने लक्ष दिले जाईन व होणाऱ्या चोऱ्या व इतर गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घातला जाईल असे सांगितलं.या बैठकीत कुडूस येथील स्थानिक या बैठकीस कुडूस परिसरातील राजकिय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# विरार येथील विद्या विहार शिक्षण संस्थेतर्फे तालुका स्तरीय लगोरी स्पर्धेला उत्तम प्रतिसाद




विरार/प्रतिनिधी

आपल्या ग्रामीण व शहरी जीवनात असंख्य मैदानी खेळापैकी लगोरी हा लोकप्रिय खेळ अलिकडे मॅटवर खेळविला जातो. या खेळाच्या रसिकांना व खेळाडूंना संघटनात्मक पातळीवर मॅटवरील लगोरी स्पर्धा पाहण्यास किंवा खेळण्यास मिळत नाहीत. मात्र विद्या विहार शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती मंगला परब यांनी पुढाकार घेऊन विरार येथील क्रीडा मैदानावर या लगोरी स्पर्धेचे आयोजन केले होते. अशा प्रकारच्या स्पर्धा क्रीडा मंडळ किंवा शिक्षण संस्था घेत नसल्याने या तालुका स्तरीय स्पर्धेसाठी मंगला परब यांनी ४० संस्थांच्या भेटीगाठी घेतल्या व या स्पर्धेतील लगोरी संघांना एकत्र आणले. या स्पर्धेमध्ये एकूण २० संघाने भाग घेतला होता. त्यात १० संघ महिला खेळाडूंचे होते. तर १० संघ पुरुष खेळाडूंचे होते. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना चषक व रोख १५ हजार रुपये (प्रथम क्रमांक), चषक व १० हजार रुपये (द्वितीय क्रमांक), चषक व ५ हजार रुपये (तृतीय क्रमांक) असे दोन्ही प्रकारच्या टीमना वितरण करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय लगोरी खेळाडू मुग्धा लेले उपस्थित होत्या. क्रिकेट व कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल अशा मैदानी खेळस्या स्पर्धा सर्वत्र भरविल्या जातात. मात्र नेम बाजीतून खेळाडूच नैपुण्य टिपणाऱ्या लगोरी खेळाला देखील मान्यवर संस्थांनी आपल्या स्पर्धांमधून सहभाग दिला पाहिजे. अशा क्रीडा स्पर्धांना उत्तेजन देणाऱ्या विविध राष्ट्रीय पक्षाच्या नेत्यांनी लगोरी टूर्नामेंट आयोजित करण्यासाठी मंगला परब यांच्या सारख्या आयोजकांना मदतीचा हात दिला पाहिजे, असे मान्यवरांनी बोलताना सांगितले. या स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्या. त्याचे श्रेय माझ्या शाळेतील शिक्षक कंवल परब, दक्षता व मेहता या शिक्षकांना व त्यांच्या सहकाऱ्यांना देत असल्याचे मंगला परब म्हणाल्या.

# विद्यार्थ्यांनी संप्रेषण कौशल्यांसहित इतर व्यक्तिमत्त्व कौशल्ये आत्मसात करावी - डॉ.विजयानंद बनसोडे



वसई/प्रतिनिधी

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये राजकीय सरहद्दी नष्ट होऊन माणसा माणसातील अंतर कमी झालेला आहे. अशा या स्पर्धात्मक जगामध्ये विद्यार्थ्यांनी संप्रेषण कौशल्यासह इतर सॉफ्ट स्किल्स स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. विजयनंद बनसोडे यांनी केले. ते आज वसई येथे अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात बोलत होते. मानवी संस्कृती ही क्रिया आणि प्रतिक्रिया यांमधून विकसित झालेली आहे. अशा अवस्थेत विद्यार्थ्यांनी अधिक सजग होऊन विविध पातळीवर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे गरजेचे आहे. स्वतःच्या हिमतीवर आज भारतीय सर्व जगभर पसरले आहेत, त्यात बरेच भारतीय उच्च उच्चपदस्थ म्हणून कार्यरत आहेत. भारताला जगाचे विकासाचे इंजिन बनण्याची संधी प्राप्त झालेली आहे. लोकसंख्येचा लाभांश याचा फायदा करून घेण्यासाठी भारतीय विद्यार्थ्यांनी पुढच्या काळामध्ये अधिक मेहनत करून नावलौकिक करण्यासाठी दक्ष राहायला हवे. या प्रक्रियेमध्ये जगभरातून संधीची उपलब्धता निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले व्यक्तित्व अष्टपैलू बनवण्यासाठी चौफेर वाचन करून अधिक स्पर्धात्मक होण्यासाठी अहोरात्र कष्ट करणे गरजेचे आहे. पुढे बोलताना ते म्हणाले भाषा माणसांच्या संवाद जोडणारी एक प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी विविध भाषिक भाषिक क्षमता विकसित करून थोर महापुरुषांची चरित्रे वाचणे गरजेचे आहे. त्यातून आपल्याला चिरकाल टिकणारी प्रेरणा मिळते आणि आपल्या जीवनाची दिशा सकारात्मक पद्धतीने ठरवता येते. वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख डॉ. भीमराव होनपारखे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रा.अमृता जाधव यांनी आभार व्यक्त केले. या विशेष व्याख्यानाला वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

05 TO 11 FEBRUARY 2024 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 2/3/2024 9:49 PM Page 1



# विरार येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्याचे उद्घाटन!





**विरार/प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन तसेच मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार प्रत्येक तालुक्यामध्ये हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना व आयुष्मान आरोग्य मंदिर सुरु करणे या उपक्रमांतर्गत ३१ जानेवारी २०२४ रोजी वसई विरार महानगरपालिका हद्दीतील मनवेलपाडा मैदान, मनवेलपाडा, विरार पूर्व येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाचे उद्घाटन आमदार क्षितीज ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच कुंभारपाडा, विरार (पूर्व) येथे आपला दवाखाना व मजेठीया नाट्यगृह, नालासोपारा येथे आयुष्मान आरोग्य मंदिर सुरु केल्याची उद्घोषणाही यावेळी करण्यात आली. उपक्रमाअंतर्गत शासनाच्या १५ व्या वित्त आयोगामार्फत महानगरपालिका क्षेत्रात ६५ आरोग्यवर्धिनी केंद्र व १५ आपला दवाखाना मंजूर असून यापैकी १० आयुष्मान आरोग्य मंदिर व ०५ आपला दवाखाना सुरु करण्यात आले असून टप्प्याटप्प्याने महानगरपालिका क्षेत्रात आपला दवाखाना व आयुष्मान आरोग्य मंदिर महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात येत आहेत. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना स्थापनेमुळे परिसरातील नागरिकांना हिमोग्लोबिन, मलेरिया चाचणी, युरिन प्रेग्नन्सी रॅपिड टेस्ट, युरिन डिपस्टिक (युरिन अल्ब्युमिन व शुगर), आर.बी.एस, डेंग्यू चाचणी, थुंकीचे नमुना संकलन, बाह्य रुग्ण तपासणी (OPD) इत्यादी सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आपला दवाखानामध्ये वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, बहुद्देशीय कर्मचारी, मदतनीस इत्यादी उपलब्ध राहतील. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना यामधील आरोग्य सेवेचा लाभ सर्व गरजू नागरिकांनी घ्यावा असे आवाहन मा.आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार महोदयांनी यावेळी केले. या कार्यक्रमास आमदार क्षितीज ठाकूर, मा.आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार (भाप्रसे), अतिरिक्त आयुक्त अजिंक्य बगाडे, महापालिकेचे माजी सभापती, माजी नगरसेवक, माजी नगरसेविका, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार, मान्यवर नागरिक, अधिकारी व कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

# लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी मतदान जनजागृतीची गरज!



**विरार/प्रतिनिधी**

विरार येथील विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्टच्या कै.पांडुरंग रघुनाथ पाटील उत्कर्ष कनिष्ठ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून प्रा. राजेश पाटील, विधीतज्ज्ञ यांचे निवडणूक साक्षरता आणि लोकशाही सक्षमीकरण या संदर्भात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. राजेश पाटील यांनी भविष्यकाळातील भारताच्या विकासासाठी लोकशाहीचे सक्षमीकरण करणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. प्रत्येक नागरिकाने मतदार नोंदणी पासून ते मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी चळवळ उभारण्यासाठी निवडणूक साक्षरतेची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समन्वयिका श्रीमती कल्पना राऊत मॅडम उपस्थित होत्या. महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी आणि सक्षम नागरिक घडवण्यासाठी असे कार्यक्रम नेहमी आयोजित करण्यासाठी आवाहन केले. विद्यार्थ्यांनी निबंध, घोषवाक्य, वक्तृत्व आणि चित्रकला अशा मतदान जनजागृतीशी संबंधित विविध विषयांवर आधारित स्पर्धामध्ये भाग घेतला. कार्यक्रमाचे आयोजन उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कला शाखेतील सर्व शिक्षकांनी केले होते. या कार्यक्रमासाठी प्राचार्या श्रीमती मनिषा चौबळ मॅडम, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत मराठे सर आणि संस्थेचे पदाधिकारी यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य मिळाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. महादेव दिनकर इरकर यांनी केले.

# वेठबिगार मुक्तीतून सुटलेल्या आदिवासी मजुरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज - विवेक पंडित



**भिवंडी/प्रतिनिधी**

वेठबिगारीतून मजुरांची मुक्तता करून भागणार नसून प्रशासनाने त्यांच्या पुनर्वसनासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार तात्काळ पावले उचलण्याची गरज आहे असे प्रतिपादन श्रमजीवी संघटनेचे संस्थापक तथा राज्यस्तरीय आदिवासी समाज विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी केले आहे.ते भिवंडीत वेठबिगार पुनर्वसन संदर्भात शासन स्तरावर काय कार्यवाही केली या बाबत आयोजित बैठकी नंतर पत्रकारांशी बोलत होते. वीटभट्टी व्यवसायातून वेठबिगार मजुरांची सोडवणूक केल्यानंतर शासनाने त्यांच्या पुनर्वसनासाठी कोणत्या उपाययोजना केल्या याचा आढावा घेण्यासाठी भिवंडी तहसीलदार कार्यालयात शासकीय अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस उपविभागीय अधिकारी अमित सानप, तहसीलदार अभिजित खोले, गटविकास अधिकारी डॉ प्रदीप घोरपडे, कामगार सहाय्यक आयुक्त विजय चौधरी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश कदम, आदिवासी प्रकल्प अधिकारी, वनविभाग अधिकारी यांसह श्रमजीवी संघटनेचे पदाधिकारी बाळाराम भोईर, दत्तात्रय कोलेकर, अशोक सापटे, प्रमोद पवार व सुनील लोणे आदी उपस्थित होते. वीटभट्टी व्यवसायात मोठ्या ...पान ६ वर

# संविधानामुळे प्रत्येक भारतीय नागरिकाला अपरिमित अधिकार मिळाले आहेत-अण्णासाहेब तिगोटे

**वसई/प्रतिनिधी**

धर्मग्रंथ इतकेच संविधान महत्त्वाचे आणि ताकदीचे असून त्याची सर्वांनी पूजा करावी असे प्रतिपादन मा.अण्णासाहेब तिगोटे यांनी नालासोपारात केले. प्रजा सुराज्य पक्षाचे पहिले अधिवेशन नालासोपारा भुईगांवातील सहयोग सेंटरमध्ये गंगाधर म्हात्रे आदिवासी सेवक तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रजा सूराज्य पक्ष यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या अधिवेशनात कार्यकर्ता प्रशिक्षण शिबाराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात प्रशासकीय कामकाज, आपले संविधान, पोलीस, महसुल कार्यालयातील कामकाज या विषयी ॲड. निलेश राऊत, मुंबई रेशनिंग कृती समिताचे रमेश कदम, बाप फाऊंडेशनचे सुरेश लोखंडे यांनी उपस्थितांना माहिती दिली. जेष्ठ साहित्यिक सायमन मार्टीन, संजय पवार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, राहुल उडानशिव सहसचिव, छोटेलाल गोंड उद्योग विभाग अध्यक्ष, मंदा वाघ महिला उपाध्यक्ष संजू तडवी उपाध्यक्ष तसेच रवींद्र माने, विजय माने ज्येष्ठ पत्रकार यावेळी उपस्थित होते. तसेच एकता कल्चरचे अध्यक्ष प्रकाश जाधव उपस्थित होते. यावेळी गंगाधर म्हात्रे यांचा नागरिक सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द




असावी लागते त्याला पैशाचा, सत्तेचा, पदाचा कोणताही लोभ नसावा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक वारसा जपण्याची कला त्यांच्याकडे असावी प्रशासकीय कामाचा अभ्यास करण्याची वृत्ती असावी त्यामुळे पत्रव्यवहार नक्की कुठे व कसा करावा ही समज पाठपुरावा करण्यासाठी योग्य दिशेने त्याचा पाठपुरावा होतो त्यातून समस्या सुटण्यास मोठी मदत होते. संविधानाने आपल्याला अपरिमित अधिकार दिले आहे. धर्मग्रंथाच्या ताकतीचा हा संविधान ग्रंथ आहे. म्हणून संविधान प्रत्येकाच्या घरात असावे आपल्याला अधिकार हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून देणारे हे संविधान आहे त्यामुळे संविधान वाचवणारे हात तयार झाले पाहिजेत असे उदगार प्रसंगीच्या वेळी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे यांनी काढले आहेत तर देशातील ८० कोटी लोकांना धान्य मोफत मिळते आणि उपोषणाचे प्रमाण हे जास्त आहे हा प्रचंड विरोधाभास आहे सरकारने दीड कोटी लोकांना धान्य नाकारले तरीही या निर्णयाला कोणीही विरोध केला नाही आरोग्य, शिक्षण, अन्न व्यवस्था खराब करण्याचे काम केले जात असताना गप्प बसलात तर तुमची पीडी मुकी होईल असे प्रतिपादन यावेळी रमेश कदम यांनी यावेळी केले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी सूर्यप्रकाश पांडे, दिनेश जंगम, कैलास जाधव, राहुल मेढा, संतोष मुद्रस, किशोर मोरे, तब्रेझ, रमा जाधव सुमित्रा वाघरी सविता विश्वकर्मा लता वाघ सपना वाघ वाघ सविता शिरसागर, मीना तडवी इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महानाट्य आणि महासंस्कृती महोत्सवाचे ७ ते ११ फेब्रुवारी या कालावधीमध्ये आयोजन

## नागरीकांनी सहभागी व्हावे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांचे आवाहन



**पालघर/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्यभिषेक वर्षानिमित्त तसेच त्यांच्या जिवनावर आधारीत त्यांचे विचार महानाट्याद्वारे जिल्ह्यातील जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी महानाट्याचे आयोजन तसेच राज्यातील विविध प्रांतातील संस्कृतीचे अदान प्रदान, स्थानिक कलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ, कला व संस्कृतीचे जतन संवर्धन आणि स्वातंत्र्य लढ्यातील ज्ञान, अज्ञान क्रांतीवीरांची शौर्यगाथा जिल्ह्यातील नागरीकापर्यंत पोहचविण्यासाठी महासंस्कृती महोत्सव व महानाट्याचे आयोजन ७ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीत करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी श्री. बोडके बोलत होते यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे तसेच पत्रकार उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य व नियोजनबद्ध पद्धतीने होण्यासाठी तसेच समन्वय व सनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय व सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली असून या समितीचे सदस्य सचिव निवासी उपजिल्हाधिकारी आहेत. महासंस्कृती महोत्सवामध्ये दुपारी ४ ते ६ या वेळेमध्ये पालघर परिसरातील शाळा महाविद्यालयांचे सांस्कृतिक कार्यक्रम सिडको मैदान, बोईसर रोड येथे आयोजित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी श्री. बोडके यांनी सांगितले. कला संस्था यांच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : दि. ७ फेब्रुवारी रोजी ठाणे येथील प्रेरणा 'कला संस्था शिवबा नाट्य' रात्री ७ ते १० या वेळेत सादर करणार आहे. 'एक संगीत संध्या ही संस्था शिवराय' हे नाट्य दिनांक ८ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत सादर करणार आहे. प्रतिभा आर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड ही संस्था 'महाराष्ट्र दर्शन' हा कार्यक्रम दि. १० फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत सादर करणार आहे. नार्थ रे मेडिया प्रा. लि. ही संस्था लोकरंग हा कार्यक्रम दि. ११ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत सादर करेल, मुंबई येथील जनजागृती समाज प्रबोधन कार्य ही संस्था वारसा संस्कृतीचा' हा कार्यक्रम दि. ११ फेब्रुवारी रोजी रात्री ७ ते १० या वेळेत सादर करेल. तसेच या ...पान ६ वर

# शहापूर येथील आश्रमशाळेतील विषबाधा प्रकरण; राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्यांची पाहाणी

**शहापूर/प्रतिनिधी**


तालुक्यातील भातसई येथील संत गाडगे महाराज आश्रमशाळेतील विषबाधा प्रकरणानंतर महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या नीलिमा चव्हाण यांनी शुक्रवारी येथे तातडीने भेट देऊन आश्रमशाळेसह वसतिगृहाची पाहणी केली. शाळेमध्ये वर्गावर जाऊन तसेच काही विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधत त्यांनी याप्रकरणाची चौकशी केली. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना आश्रमशाळेतून दिले जाणारे जेवण व्यवस्थित आहे की नाही हे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत जेवणाचा आस्वादही घेतला. दरम्यान, याप्रकरणी बाल हक्क संरक्षण आयोग काय कारवाई करणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. शहापुर तालुक्यातील भातसई येथील संत गाडगे महाराज आश्रमशाळेतील १०९ विद्यार्थी बाहेरून आलेले वर्षश्राद्धाचे जेवण जेवले. यामुळे त्यांना उलटी, चक्कर, पोटदुखी असा त्रास झाला होता. बुधवारी झालेल्या या प्रकारामुळे शासकीय व प्रशासकीय यंत्रणांची एकच धावपळ उडाली होती. उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त करीत परिस्थिती आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला. दरम्यान, या आश्रमशाळेला महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या नीलिमा चव्हाण यांनी शुक्रवारी भेट दिली. त्यांनी वर्गात जाऊन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांशी वैयक्तिकपणे संवाद साधला. तसेच संतप्त महिला पालकांनी त्यांच्यापुढे विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांचा पाढाच वाचून



दाखवला. मुलांना काही झाले असते तर याची जबाबदारी कोणाची, अशी विचारणा करत दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी साबणाची छोटी वडी महिन्यातून एकदाच दिली जाते, डोक्याला लावण्यासाठी सुट्ट्या बॉटल मध्ये तेल दिले जाते, अशा तक्रारी पालकांनी यावेळी केल्या. आम्हाला कोणताही अधिकार नाहीत. संस्थाचालक सांगतात त्याप्रमाणे केले जाते. या शाळेवर महिन्यातून तब्बल १२ ते १५ वेळा जेवण बाहेरून दिले जाते, असे सांगून अधीक्षक एन. डी. अंभोरे यांनी खळबळ उडवून दिली. या प्रकरणाशी आमचा काहीही संबंध नसताना आमच्या विरुद्ध गुन्हा नोंदवला असल्याचे सांगत अधीक्षक अंभोरे व प्राथमिकच्या प्रभारी मुख्याध्यापिका सारीका गायकवाड यांनी याबाबत आयोगाच्या सदस्या ...पान ६ वर

## गांधीजींच्या स्मृतींना काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे अभिवादन!

# गांधीजींच्या स्मारकाकडे दुर्लक्ष करणे हा त्यांचा आणि संपूर्ण राष्ट्राचा अपमान; समीर वर्तक यांची तहसीलदारांकडे तक्रार



**विरार/प्रतिनिधी**

काल राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीदिनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेश प्रमुख समीर सुभाष वर्तक आपल्या सहकाऱ्यांसोबत अर्नाळा येथील दि. ८ फेब्रुवारी १९४८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या विधिवत अस्थीकलश विसर्जित केलेल्या ठिकाणी उभारण्यात आलेल्या स्मारकाला अभिवादन करण्यासाठी पोहोचले असता, तेथे स्मारक बंद आणि अस्वच्छ अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले. तेव्हा समीर वर्तक यांनी स्वतः झाडू हातात घेऊन स्मारक स्वच्छ करून आपल्या सहकाऱ्यांसोबत राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या स्मारकाला पुष्पहार आणि फुले वाहून अभिवादन केले. तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीदिनी त्यांच्या स्मारकाकडे दुर्लक्ष करणे एकप्रकारे हा त्यांचा आणि संपूर्ण राष्ट्राचा अपमान आहे. त्यामुळे संबंधित दोषींवर त्वरित कारवाई झाली पाहिजे असे समीर वर्तक ह्यांनी वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांना फोनद्वारे सांगितले आहे. कोष्टी यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन वर्तक यांना दिले. यावेळी समीर वर्तक यांच्यासोबत महाराष्ट्र काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचे प्रदेश सरचिटणीस व वाघोलीचे ...पान ६ वर

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर आरोग्याकडेही लक्ष द्यावे -डॉ.माले




**लातूर/प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धेच्या युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. यासोबतच सुदृढ आरोग्यही गरजेचे आहे. चांगला अभ्यास करून परीक्षेला सामोरे जाताना आरोग्य बिघडले तर पेपर उत्तम प्रकारे सोडवता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी आरोग्य उपसंचालक डॉ. एकनाथ माले यांनी केले. 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमांतर्गत येथील तुळजाभवानी शैक्षणिक संकुलातील तुळजाभवानी प्राथमिक विद्यालय, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व तुळजाभवानी इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यांसाठी बुधवारी आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले, यावेळी ते उद्घाटक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य ...पान ६ वर

# अपघातात मृत्यू झालेल्या सिध्दी फुटाणेचे नेत्रदान!



**विरार/प्रतिनिधी**

विरारमध्ये बसच्या धडकेत मरण पावलेल्या सिध्दी फुटाणे या तरुणीचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले आहे. दु:खाच्या प्रसंगातही तिच्या पालकांनी संयम ठेवून हे सामाजिक दातृत्व दाखवले आहे. सिध्दी या जगात नसली तरी डोळ्यांच्या रुपाने ती जिवंत राहून दृष्टीहिनांच्या आयुष्यात प्रकाश बनणार आहे. सिध्दी फुटाणे (१९) ही तरुणी विरारच्या गोपचपाडा येथे रहात होती. मंगळवारी नरसिंह गोविंद वर्तक या शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल जाणार होती. या शाळेत सिध्दीचा लहान भाऊ ओम पाचव्या इयत्तेत शिकतो. सिध्दी त्याला सोडायला शाळेत गेली होती. सहलीसाठी शाळेच्या एकूण ११ बसेस निघाल्या होत्या. सिध्दीने भावाला बस मध्ये बसवून निरोप दिला. मात्र बस क्रमांक (एमएच ४७ ए एस ३८३४) ही मागे वळण घेत असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि भिंतींजवळ उभ्या असलेल्या सिध्दीला चिरडले. त्यात ती गंभीर जखमी झाली होती. तिला विरारच्या संजिवनी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. मुलीच्या अपघाती मृत्यूमुळे तिच्या पालकांवर दु:खाचा डोंगर कोसळला होता. परंतु त्याही परिस्थितीत त्यांनी खचून न जाता आई अश्विनी आणि वडील अनिल फुटाणे यांनी आपल्या लाडक्या मुलीचे डोळे दान करण्याचा निर्णय घेतला. देहमुक्ती मिशनचे पुरूषोत्तम पवार यांनी याकामी सहकार्य केले. शवविच्छेदन, पंचनामा आणि इतर कायदेशीर प्रक्रियेत वेळ निघून जात होता. परंतु सिध्दीचा भाऊ सचिन आणि त्याचा मित्र साकीब शेख यांनी प्रत्येक सुचनांचे पालन करून वेळेत प्रक्रिया केली आणि सिध्दीच्या दोन्ही डोळ्यांचे दान ...पान ६ वर